दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ मंगळवार, दि.२२ एप्रिल २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १८४ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी दिल्लीतील महाराष्ट्र सदनमध्ये बैठक



वाशीम : महाराष्ट्र सदन, दिल्ली येथे आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष नामदार पाशा पटेल यांच्यासोबत चर्चा करण्यात आली.शेतकऱ्यांच्या सन २०२४-२५ च्या सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांच्या अग्रिम व काढणीपश्चात पिकविमा रक्कम तात्काळ मिळावी, बांबू लागवडीसाठी अनुदान मिळावे आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी करून नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशा मागण्यांवर चर्चा झाली. या बैठकीत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, हिंगोली जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, रामेश्वर कावरखे, अमोल एकशिंगे, प्रवीण मते पाटील, संतोष माहूरकर, वाशिम जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे, सतीश विडोळे, शामराव मते, देवानंद जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

पिंक ई-रिक्षा हे महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेच्या दिशेने महत्वाचे पाऊल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर ■ दिलीप येवले

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पात्र महिलांना ५० पिंक ई-रिक्षांचे वितरण;मुख्यमंत्र्यांनी केला पिंक-ई- रिक्षातून प्रवास



नागपूर : महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने विविध निर्णय घेतले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिलांद्वारे महिलांसाठी संचालित पिंक ई-रिक्षा योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. लाभार्थी महिलेच्या पिंक ई-रिक्षातून प्रवास करत त्यांनी महिलांना कृतिशील विश्वासही दिला.

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने येथील नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात पिंक ई-रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई-रिक्षा वितरित करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार संदीप जोशी आणि डॉ. आशिष देशमुख, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, महिला व बाल विकास आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्धअसून विविध योजनांच्या माध्यमातून हे कार्य प्रभावीपणे सुरूआहे. महिला व बालविकास विभागाने पिंक ई-रिक्षा या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच कामकाजी महिलांना या महिलांच्या ऑटो रिक्षामध्ये बसून सुरक्षित प्रवास करण्याची हमीही या योजनेने दिली आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र लाभार्थी महिलांना ई-रिक्षा वितरित झाल्या असून जिल्ह्यात २ हजार महिलांना या योजनेअंतर्गत ई -रिक्षा वितरीत होवून रोजगार उपलब्ध होणार आहे.

नागपूर शहरातील विविध मेट्रो स्टेशनवर प्रवाशांना फिडरसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महामेट्रो दरम्यान करार झाला आहे. यातून पिंक ई-रिक्षाधारक महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होणार आहे. राज्याच्या पर्यटन विभागासह अन्य विभागासोबत भविष्यात असे करार करून या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यावेळी म्हणाल्या, राज्य शासनाने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी पिंक ई-रिक्षा ही योजना आणली आहे. राज्यातील आठ जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येत असून पहिल्या टप्प्यात येत्या सहा महिन्यात पाच हजार रिक्षा वितरीत करण्याचे उद्दिष्ट आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना ई -रिक्षा वितरित करून पहिल्या टप्प्यातील वितरणाची सुरुवात झाली आहे. या महिलांना किमान दहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. पाच वर्षांचा रिक्षाचा मेंटेनन्स आणि चार्जिंग ची व्यवस्था ही त्यांना करून देण्यात आली आहे. महामेट्रो सोबत करार करून फिडर सेवेअंतर्गत या महिलांच्या ई-रिक्षाची सेवा उपलब्ध होऊन त्यांना रोजगारही मिळणार आहे. येत्या काळात विमानतळ, पर्यटन स्थळ अशा ठिकाणीही पिंक ई-रिक्षा सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते यावेळी प्रतिनिधिक स्वरूपात ११ पात्र महिला लाभार्थ्यांना ई-रिक्षाच्या चाव्या वितरित करण्यात आल्या.

मुख्यमंत्र्यांनी केला पिंक-ई-रिक्षातून प्रवास

कार्यक्रम संपल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नागपुरातील सन्याल नगर, टेका नाका नारीरोड येथील पूजा नरेंद्र वानखेडे यांच्या पिंक ई रिक्षातून महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्यासह प्रवास केला. या पिंक ई रिक्षाचे पहिले प्रवासी होण्याचा मान मिळवत त्यांनी महिलांना विश्वासही दिला.

महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महत्वाकांक्षी पिंक ई-रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यात २००० पिंक ई-रिक्षा वितरित होणार आहेत. यासाठी २० ते ५० वर्षे वयोगटातील इच्छुक महिलांचे २०४० अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने १०३२ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी ५० पात्र लाभार्थी महिलांना पिंक ई-रिक्षा वितरित करण्यात आले.

थोडक्यात योजनेविषयी

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंक ई-रिक्षा ही महत्वाकांक्षी योजना राज्यातील आठ जिल्ह्यांकरीता राबविण्यात येणार आहे. यात नागपूर जिल्ह्यामध्ये २००० महिलांना पिंक ई-रिक्षा वाटप करण्याचे उद्दिष्ट दिलेले आहे. या योजनेंतर्गत पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यांत महाराष्ट्र शासनाकडून इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व ई-रिक्षा चालवण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाणून घेतल्या जनतेच्या समस्या मुख्यमंत्र्यांच्या जनता दरबारात ६२६ अर्ज

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्री सचिवालयात आयोजित जनता दरबारात जनतेच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांच्या निराकरणासाठी विविध विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्या. त्यांनी या जनता दरबारात एकूण ६२६ निवेदने स्वीकारली.

महिला व बाल विकास विभागाच्या पिंक ई-रिक्षा वितरण कार्यक्रमाला उपस्थिती लावल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना भेटण्यासाठी व आपल्या समस्या मांडण्यासाठी नागपूरच्या विविध भागातील नागरिकांनी येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील हैदराबाद हाऊस या मुख्यमंत्री सचिवालयात गर्दी केली होती. श्री फडणवीस यांना दिव्यांग, महिला, विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या समस्या सांगून निवेदन दिले. त्यांचे म्हणणे ऐकून घेत मुख्यमंत्री यांनी समस्या सोडवण्याबाबत आश्वस्थ केले. दुपारी १२ ते ३ दरम्यान या जनता दरबारात जवळपास २ हजार नागरीक सहभागी झाले होते तर ६२६ निवेदन प्राप्त झाली आहेत.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह ऊर्जा विभाग, सार्वजनिक बांधकाम, भूमि अभिलेख, समाज कल्याण आदी विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

जनतेच्या अर्जांवरील कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री सचिवालयात लवकरच पीजीआरएस प्रणाली मुख्यमंत्र्यांसमोर झाले सादरीकरण

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : विविध कार्यक्रमांमध्ये तसेच येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील मुख्यमंत्री सचिवालय-हैदराबाद हाऊस मध्ये प्राप्त होणारे जनतेचे अर्ज व निवेदनांवर सकारात्मक कार्यवाही होऊन या अर्जाची सद्यस्थिती अर्जदाराला एसएमएसद्वारे कळण्यासाठी पब्लिक ग्रिव्हेन्सेस रिड्रर्सल सिस्टिम (पीजीआरएस) ही ऑनलाईन प्रणाली लवकरच कार्यान्वित होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुख्यमंत्री सचिवालयात या संदर्भात बैठक झाली.

शासकीय कामकाजामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला तात्काळ दिलासा देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. यास अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दौऱ्यावेळी व येथील मुख्यमंत्री सचिवालयात विविध विभागांशी व विषयांशी संबंधित निवेदने, अर्ज व तक्रारी संबंधित विभागाकडे पाठवून त्यावर उचित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने पीजीआरएस ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री सचिवालयाच्या विशेष कार्याधिकारी आशा पठाण यांनी या ऑनलाईन प्रणाली विषयी सविस्तर सादरीकरण केले.

या ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त निवेदने व अर्जांचे विभागनिहाय व तक्रारनिहाय वर्गीकरण करण्यात येईल. हे अर्ज व निवेदने स्कॅन करून संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल व त्याची माहिती एसएमएसद्वारे अर्जदाराला कळेल. संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येऊन अर्जदाराचा अर्ज निकाली काढल्याबाबत अर्जदारास एसएमएसद्वारे माहिती मिळेल. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या ऑनलाईन प्रणालीबाबत समाधान व्यक्त केले. लवकरच ही सुविधा जनतेच्या सेवेत रूजू होणार आहे.

बैठकीस विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, भूमि अभिलेख, समाज कल्याण आदी विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर महापालिकेच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचे अनावरण

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : नागपूर महापालिकेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तयार करण्यात आलेल्या बोधचिन्हाचे (लोगो) अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज हैदराबाद हाऊस येथील मुख्यमंत्री सचिवालयात करण्यात आले.

यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र सिंगल, महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ व बोधचिन्हाचे रचनाकार विवेक रानडे यावेळी उपस्थित होते.

नागपूर शहरातील नागरिकांच्या सेवेत 'पौर जन हिताय' हे ब्रिदवाक्य घेऊन अहोरात्र काम करणाऱ्या नागपूर महापालिकेची स्थापना २ मार्च १९५१ रोजी झाली. महापालिकेच्या अमृत महोत्सव वर्षाला २ मार्च २०२५ पासून सुरुवात झाली आहे. या औचित्याने मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते, बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले असून महापालिकेच्या सर्व पत्रव्यवहार व मनपाच्या इतर प्रशासकीय कामकाजामध्ये याचा रितसरपणे उपयोग करण्यात येणार आहे.अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महापालिकेने विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे. शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या महापुरुषांच्या आठवणींनाही यादरम्यान उजाळा देण्यात येणार आहे.शासनाने १९५१ मध्ये नागपूर मनपाचे प्रशासक म्हणून जी.जी. देसाई यांची नियुक्ती केली. त्यांच्या मार्गदर्शनात जून १९५२ मध्ये महापालिकेची निवडणूक झाली आणि बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांना प्रथम महापौर होण्याचा मान मिळाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर नगरीचे दोनदा महापौर पद भूषविले आहे. तसेच विद्यमान आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, विकास ठाकरे, संदीप जोशी हे सुद्धा नागपूर महापालिकेचे महापौर आणि उपमहापौर राहिलेले आहेत.नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासात आतापर्यंत ५४ महापौर, ५६ उपमहापौर आणि ५० आयुक्तांची सेवा नागपूर महानगरपालिकेला लाभली आहे. महाराष्ट्रात नागपूरला उपराजधानीचा दर्जा प्राप्त असून नागपूरसाठी आधी सी.एन.सी. ॲक्ट १९४८ अंमलात होता. आता राज्य शासनाच्या आदेशान्वये संपूर्ण राज्यात एकच कायदा लागू करण्यात आला आहे. नागपूर महानगरपालिकेमध्ये आयुक्त म्हणून काम करणारे जे.एस. सहारिया आणि मनू कुमार श्रीवास्तव यांना राज्याचे मुख्य सचिव पदावर काम करण्याचा सन्मान प्राप्त झाला आहे. तसेच इतर आयुक्त म्हणून काम केलेले अधिकारी देखील राज्य शासनात वेगवेगळ्या पदावर काम करीत आहेत.

मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वीतेसाठी शासन कटीबद्ध : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था ■ मुंबई

विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड संस्थेचे सहकार्य



मुंबई : नागरिकांचे आरोग्य प्राधान्यक्रमावर ठेवून नागरिकांच्या आरोग्य विषयक अनेकविध योजना शासनामार्फत सुरू करण्यात आल्या आहेत. वयस्क लोकांमध्ये मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता टाळण्यासाठी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वी करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. शासनाचे हे मिशन पूर्णत्वास नेण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड या संस्थेने सर्वतोपरी सहकार्यासाठी पुढाकार घेतला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत मुख्य

मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरू आहे. शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची २०१८ मध्ये नव्याने सुरवात करण्यात आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (ण्थ्) ही संस्था इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (आयजीएमसी), नागपूर यांना मदत करत आहे. डब्ल्युसीएल या संस्थेच्या माध्यमातून आयजीएमसी, नागपूर यांनी गेल्या वर्षभरात साधारण चार हजार मोतीबिंदूच्या शस्त्रक्रीया केल्या आहेत. तसेच शासनासोबत केलेल्या कराराच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन स्वप्नपूर्तीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रम राबवून यापुढील तीन वर्षात दरवर्षी साधारण चार हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी देखील ही संस्था सहकार्य करणार आहे.

ही संस्था विदर्भातील ग्रामीण भागामध्ये शिबीर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे त्या रुग्णाचे निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहोचवून त्यांच्यावर मोफत उपचार करतील. तसेच या मार्फत रुग्णालयांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील. डब्ल्यूसीएल संस्थेचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या यशस्वीतेसाठी शासनालाअसलेले सहकार्य पाहून इतर स्वयंसेवी संस्था देखील या कामात पुढाकार घेतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

२२ एप्रिल ते १ मे या कालावधीत राज्यात विविध उपक्रम साजरे होणार : पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे

वृत्तसंस्था ■ मुंबई

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' उपक्रमात सहभागी व्हा; आपल्या वसुंधरेसाठी नऊ दिवस समर्पित भावनेने काम करा



मुंबई : पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन दिनांक २२ एप्रिल, २०२५ ते महाराष्ट्र दिन १ मे, २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.

'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

नदी, नाले, तलाव स्वच्छता अभियानात सहभागी व्हावे

श्रीमती मुंडे म्हणाल्या, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण वातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासून म्हणजे, २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत. २२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील, आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील, नगरातील पाण्याचे विविध स्त्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायची आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत, ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री या सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील यामध्ये सहभाग घ्यावा. नदी - नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे मूल्यमापन करून त्यांचा सुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

रीड्यूस, री युज आणि रिसायकल या त्रिसूत्रीचा प्रयोग करणाऱ्यांचा होणार सत्कार

दि. २५, २६ आणि २७ एप्रिल या तीन दिवसांमध्ये विविध संघटना, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून रीड्यूस, री युज आणि रिसायकल या तत्त्वाप्रमाणे म्हणजे, आपण कुठल्याही चुकीच्या गोष्टींचा वापर कमी करणे म्हणजे रीड्यूस करणे, त्याचबरोबर कोणत्याही चांगल्या गोष्टी ज्या आपण परत परत वापरू शकतो त्यांचा रीयूज करणे आणि कुठल्याही गोष्टी जसे पाणी रिसायकल करतो आणि ते वापरतो त्यामुळे आपण वसुंधरेचा म्हणजे पृथ्वीचा फार मोठा फायदा त्याच्यामधून होतो आणि पर्यायी आपल्याला त्याचा फायदा होत असतो. त्यामुळे या त्रिसूत्री चा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, रीड्यूस, री यूज आणि रिसायकल या तत्त्वावर कोणी जर अत्यंत चांगले प्रयोग केले असतील, तर या प्रयोगांचा सन्मान एक मे रोजी महाराष्ट्रदिनी ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते त्या त्या जिल्ह्यामध्ये होईल. तसेच हे प्रयोग राज्य पातळीवर मागवून यांच्यामधले उपयुक्त प्रयोगाचे कौतुक करून त्यांचा सन्मान करण्यात येईल. तसेच अशा प्रयोगाचा उपयोग विविध योजनामध्ये करण्याचा विचार आहे, असेही त्यांनी सांगितले.

घोषवाक्य स्पर्धा घेऊन विजेत्यांना गौरविणार

दि . २८, २९ व ३० एप्रिल या तीन दिवसांमध्ये पर्यावरण बचाव वसुंधरा सजाव या अभियानाच्या माध्यमातून घोषवाक्य (स्लोगन) स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्यातील उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्यांचा सन्मान हा महाराष्ट्र दिनानिमित्त करण्यात येईल. तसेच या घोषवाक्याचा समावेश महाराष्ट्र दिनाच्या संचलनात देखील करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यामधून तीन असे घोषवाक्य घेऊन राज्यस्तरावर तीन उत्कृष्ट घोषवाक्य निवडण्यात येतील. याचा वापर महाराष्ट्राच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या जाहिरातींमध्ये केला जाईल. उत्कृष्ट तीन घोषवाक्य करणाऱ्यांचा राज्यस्तरावर सन्मान करण्यात येईल. २२ एप्रिल ते १ मे या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. हे उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोकप्रतिनिधी तसेच सामान्य नागरिक यांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

संपादकीय...

निर्गुतवणूक वेगाने करा...

भारताच्या करसंकलनात सन २०००-०१ पासून सातत्याने वाढ होत आहे. तसेच कर संकलनामधील प्रत्यक्ष कराचा वाटा वाढत आहे. करसंकलनात वाढ होणे आणि प्रत्यक्ष कराचा हिस्सा वाढणे या दोन्ही बाबी स्वागतार्ह आहेत. सन २०००-०१मध्ये करांचे उत्पन्न सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) ८.८ टक्के इतके होते. त्यात सातत्याने वाढ होऊन एकूण करसंकलन सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ११.७ टक्के एवढे २०२३-२४ पर्यंत वाढले आणि त्यानंतरही त्यात वाढ झाली आहे. तसेच उपरोक्त कालखंडात एकूण करसंकलनातील प्रत्यक्ष करांचा हिस्सा ३.२५ टक्क्यांवरून ६.६४ टक्के एवढा वाढला आहे. उपरोक्त कालखंडात कंपन्यांवरील कराच्या दरात सुमारे १० टक्क्यांची कपात करण्यात आली होती आणि व्यक्तींसाठी करांच्या सवलतीत वाढ करण्यात आली होती. तरीही एकूण करसंकलनात लक्षणीय प्रमाणात वाढ झालेली आहे. ही वाढ, हा चांगला बदल दोन कारणांमुळे झाला असावा. पहिले कारण म्हणजे, कर भरणाऱ्या लोकांच्या संख्येत झालेली वाढ आणि दुसरे कारण म्हणजे, करांचे संकलन करणाऱ्या नोकरशाहीने पूर्वीपेक्षा चांगल्या पद्धतीने केलेले काम! भारतातील डिमॅट खाते असणाऱ्या नागरिकांची संख्या आणि क्रिप्टो करन्सीचे व्यवहार करणाऱ्या लोकांची संख्या या दोन बाबी विचारात घेता प्रत्यक्ष कर भरणाऱ्या लोकांची संख्या कमी आहे, असे वाटते. तसेच कर भरणाऱ्या श्रीमंत लोकांनी व कंपन्यांनी न्यायालयात करलवादाकडे दाखल केलेल्या खटल्यांमुळे हजारो कोटी रुपयांचे करांचे उत्पन्न सरकारला अद्याप मिळालेले नाही. याबाबत सातत्याने वाद सुरू असतात. अशा वादांची संख्या वर्षागणिक वाढतेच आहे. हे असे वाद निकाली काढण्याचे काम अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे, असे दिसते. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 'विवाद से विश्वास' ही योजना सुरू केलेली असली तरी त्यामुळे वाद मोठ्या प्रमाणावर निकाली निघून करसंकलनात मोठी वाढ होईल, ही अपेक्षा पूर्ण झालेली नाही. केंद्रातील मोदी सरकारने अनावश्यक सरकारी खर्चात कपात करण्याचे काम नेटाने सुरू ठेवले आहे, हे खरे. परंतु वाढत्या महागाईमुळे सरकारी नोकरांना देय असणाऱ्या महागाई भत्त्यात सातत्याने वाढ होते आहे. तसेच निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना देय असणाऱ्या निवृत्तीवेतनात आणि महागाई वेतनात सातत्याने वाढ होत आहे, हे लक्षात घ्यायला हवे. आठव्या वेतन आयोगाचा अहवाल आल्यानंतर वेतन व निवृत्तीवेतन यावर खर्च होणाऱ्या रकमेत लक्षणीय प्रमाणात वाढ होणार आहे. एकंदरीत भारतात वाढणारी महागाई ही सरकारच्या खर्चात सतत वाढ करणारी प्रक्रिया ठरते आहे. सन १९६८पासून आजपर्यंतच्या कालखंडाचा विचार केला, तर या कालखंडात भारतात वर्षाला सरासरी ७.५ टक्के इतक्या दराने महागाई वाढलेली दिसते. विकसित देशात महागाई वर्षाला सरासरी दोन टक्के दराने वाढलेली पाहावयास मिळते. या आकडेवारीकडे, या वास्तवाकडे राज्यकर्ते दुर्लक्ष करीत आहेत. भारत हा विकसनशील देश आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य सुविधा अशा कामांसाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर खर्च करणे अपेक्षित आहे. ते स्वाभाविकही आहे. परंतु केंद्र सरकारला करांच्याद्वारे मिळणारे उत्पन्न तुटपुंजे आहे. तसेच करसंकलनातील मोठा हिस्सा राज्य सरकारांना मिळतो आणि दर पाच वर्षांनी नियुक्त केलेले वित्तीय आयोग एकूण करसंकलनातील राज्य सरकारांच्या हिश्श्यात वाढ करते. परिणामी केंद्र सरकारचे नक्त उत्पन्न गरजेपेक्षा लक्षणीय प्रमाणात कमी ठरते. या कारणांमुळे शिक्षण व सार्वजनिक आरोग्य सुविधा यावर पुरेसा खर्च होत नाही. वरील बाबी लक्षात घेतल्या तरीही केंद्र सरकारला शिक्षण व सार्वजनिक आरोग्य सुविधा या महत्त्वाच्या बाबींकडे सातत्याने दुर्लक्ष करता येणार नाही. आपले उत्पन्न वाढविण्यासाठी वेगळ्या मार्गाचा अवलंब सरकारला करावाच लागेल. असा नवीन मार्ग म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खासगीकरण करणे! पंतप्रधान नरेंद्र मोदी हे, सरकारचे काम उद्योगधंदे चालविणे हे नसून चांगले सुशासन करणे आहे, असे वारंवार ठासून सांगत असतात. परंतु गेल्या ११ वर्षांत केवळ 'एअर इंडिया' या एका उद्योगाचे खासगीकरण करण्यात आले आहे. या उद्योगाचा तोटा दर वर्षी वाढत होता. खासगीकरण केल्यानंतर टाटा समूहाने अल्पावधीत या उद्योगाचे रूपांतर नफा मिळविणाऱ्या उद्योगात केले आहे. भारतातील इतर खासगी विमानसेवा उद्योग कसेबसे चालत असताना टाटा समूहाने 'एअर इंडिया'चा केलेला कायापालट उल्लेखनीय ठरतो. देशाच्या पंतप्रधानपदी असताना अटलबिहारी वाजपेयी यांनी निर्गुतवणूक करण्यासाठी एक स्वतंत्र खाते तयार करून अरुण शौरी या कर्तबगार व कार्यक्षम व्यक्तीची त्या खात्याचे मंत्री म्हणून नेमणूक केली होती. त्यामुळे तेव्हा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खासगीकरण करण्याची प्रक्रिया चांगलीच गतिमान झाली होती. आत्ताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्गुतवणुकीच्या संदर्भात वाजपेयी सरकारचा कित्ता अंगिकारायला हवा. खासगीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतल्यावर केंद्र सरकारच्या उत्पन्नात लक्षणीय प्रमाणात वाढ होईल. कारण खासगीकरण केल्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नावर पूर्णपणे केंद्र सरकारचा हक्क असतो. राज्य सरकारांना त्या उत्पन्नामधील एक रुपयाही मिळत नाही. खासगीकरण केल्यावर अकार्यक्षम पद्धतीने चालणारे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग उद्योगपती कार्यक्षम पद्धतीने चालवतील. सरकारला कराच्या रूपाने चांगले उत्पन्न दर वर्षी मिळेल. तसेच अशा उद्योगांची उलाढाल वाढल्यामुळे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. खासगीकरण केल्यामुळे होणारे फायदे अनेक आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. खासगीकरण केल्यामुळे नोकरकपात होणार नाही. उलट मध्यम पल्ल्याच्या काळात खासगीकरण झालेल्या उद्योगाचा विस्तार होऊन अधिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने 'एअर इंडिया' ही तोट्यात चालणारी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी टाटा समूहाला विकून सरकारच्या डोक्यावरील आर्थिक भार हलका केला. सार्वजनिक क्षेत्रातील अनेक कंपन्यांचे खासगीकरण होणे गरजेचे आहे. सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग तोट्यात चालणारे आणि सरकारला आर्थिकदृष्ट्या बोजा ठरणारे आहेत. हे पाहता सरकारने आपल्या शिरावरील भार उतरवायला हवा. सध्या सार्वजनिक क्षेत्रातील बँका नफा मिळवत आहेत, या कारणास्तव त्यांचे खासगीकरण न करणे योग्य ठरणार नाही. सरकारने स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा अशा मोठ्या आकारमानाच्या बँका वगळून सार्वजनिक क्षेत्रातील उर्वरित बँकांचे खासगीकरण करणे गरजेचे आहे. आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाची घोषणा सरकारने केली असली तरी प्रत्यक्षात खासगीकरणाचे काम रखडले आहे. सध्या आर्थिक तेजीचे वातावरण आहे. त्यामुळे निर्गुतवणूक करून सरकारला चांगले उत्पन्न मिळेल. अशी संधी सरकारने वाया घालवू नये. निर्गुतवणुकीच्या प्रक्रियेने वेग घेतल्यावर केंद्र सरकारला पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, शिक्षण व सार्वजनिक आरोग्य सुविधा अशा महत्त्वाच्या कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होईल आणि आर्थिक विकासाची घोडदौड सुरू राहील. ते सध्याच्या घडीला अतिशय गरजेचे आहे.

!!! कवी व तत्वज्ञ भूमिकांचे आविष्कारक !!!

मुहम्मद इक्बाल पुण्यतिथी विशेष...



सर मुहम्मद इक्बाल हे सन १९३०मध्ये मुस्लिम लीगचे अध्यक्ष निवडले गेले. त्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची योजना मांडून ती कार्यान्वित होण्याची मागणी केली. त्यांच्या काव्यात तात्त्विक, धार्मिक, नैतिक, राजकीय विचारांचा मिलाफ व कलात्मक आविष्कार आढळतो. कवी व तत्त्वज्ञ अशा दोन्ही भूमिकांचा त्यांच्या काव्यात आविष्कार असल्यामुळे त्यांच्या काव्याबाबत टीकाकारांत तीव्र मतभेद आहेत. त्यांच्या काव्यावर आतापर्यंत अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले. मानवाच्या अमर्याद आत्मशक्तीवर त्यांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर दिलेली आढळते. स्वप्नरत?नाने आणि चारित्र्याने माणूस स्वतःचा विकास स्वतःच करू शकतो, अशी त्यांची धारणा होती. उर्दूपेक्षा त्यांचे फार्सी काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण मानले जाते. अधिक माहितीसाठी श्री. कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांचा हा लेख जरूर वाचाच... संपादक.

सर मुहम्मद इक्बाल हे उर्दूचे व फार्सीचे एक थोर कवी व विचारवंत होते. 'इक?बाल' हे त्यांचे कवितेतील टोपणनाव होय. त्यांचे पूर्वज काश्मीरी ब्राह्मण होते. इक्बाल यांचा जन्म दि. २२ फेब्रुवारी १८७३ रोजी सियालकोट येथे झाला. सियालकोट येथील मरे कॉलेजमध्ये त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण झाले व लाहोर येथून त्यांनी तत्त्वज्ञानात एमएची पदवी घेतली. नंतर जर्मनीतील म्यूनिक येथे जाऊन त्यांनी तत्त्वज्ञानात डॉक्टरेट मिळविली. इंग्रजी, जर्मन, फार्सी आणि उर्दू या चार भाषांवर त्यांचे अगाध प्रभुत्व होते. सन १९०८ साली ते इंग?लंडहून बॅरिस्टर होऊन स्वदेशी परतले. सुरुवातीस त्यांनी लाहोर कॉजेलातील प्राध्यापकाची नोकरी पत्करली. परंतु थोड्याच दिवसांत ती सोडून दिली व शेवटपर्यंत वकिलीचा व्यवसाय केला. लहानपणापासून ते कविता करीत होते. त्यांच्यावर सुरुवातीस सूफी विचारांचाही प्रभाव होता. 'हिदायतु-उल् इस्लाम' या संस्थेच्या सभांमधूनही ते आपल्या कवितांचे वाचन करीत. आपली ओजस्वी आणि राष्ट्रीय कविता त्यांनी सुरुवातीच्या काळातच लिहिली ती अशी-

'सारे जहाँसे अच्छा;
हिंदोस्ताँ हमारा'
हम बुलबुले है जिसकी;
यह गुलसिताँ हमारा!!'



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

युरोपातील तीन वर्षांच्या वास्तव्याने त्यांचा आरंभीचा राष्ट्रीय दृष्टिकोन सर्वस्वी बदलला आणि ते पूर्ण इस्लामवादाकडे वळले. त्यावेळी तुर्कस्तानची स्थिती आणि सत्ता डळमळीत झालेली होती, इराणवर रशियाचा डोळा होता आणि उत्तर आफ्रिकेच्या ट्रिपोलीवरील मुसलमानी सत्ता संपुष्टात आली होती.

इस्लामच्या या अवनतीच्या काळातच त्यांनी आपली प्रसिद्ध व हृदयस्पर्शी कविता लिहिली. सर्व इस्लामवादाचा गडद प्रभाव त्यांच्या विचारसरणीवर असल्यामुळे ते नंतर उर्दूऐवजी फार्सीत लेखन करू लागले. फार्सीचा आश्रय घेतल्याने आपले लेखन व तत्त्वज्ञान यांचा प्रसार सर्व इस्लामी राष्ट्रांत होऊ शकेल, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या तात्त्विक विचारसरणीवर आंरी बेर्गसाँ आणि फ्रीड्रिख नीत्शे यांच्या विचारांचा पगडा होता. हे त्यांच्या असरारे खुदी आणि रूमूजे बे खुदी या दोन फार्सी खंडकाव्यमस?नवींवरून स्पष्ट दिसते. या दोन्ही मस?नवींचा इंग्रजी अनुवाद केंब्रिजचे प्राध्यापक निकल्सन यांनी केला. इक्बाल यांना सन १९२२मध्ये 'सर' हा किताबही या ग्रंथांमुळेच बहाल करण्यात आला. त्यांच्या लेखनाला जागतिक कीर्ती लाभली. दांतेकृत डिव्हाइन कॉमेडीच्या धर्तीवर त्यांच्या फार्सी काव्यांचे पयामे मशरिक आणि जावेदनामा हे संग्रह निघाले. सन १९३५पासून ते पुन्हा उर्दूत लेखन करू लागले. बाले जिब?रैल आणि जर्ब-कलीम हे दोन उर्दू काव्यसंग्रह त्यांनी आयुष्याच्या अखेरीअखेरीस लिहिले. त्यांच्या प्रगत विचारांचे दर्शन या संग्रहांतून घडते. त्यांच्या आरंभीच्या उर्दू कविता बाँगे दरा या संग्रहात आहेत. हैदराबाद, म्हैसूर, मद्रास व अलीगढ येथे त्यांनी इंग्रजीत जी व्याख्याने केली, त्यांचा संग्रह लेक्चर्स ऑन द रिकन्स्ट्रक्शन ऑफ रिलिजस थॉट इन इस्लाम या नावाने प्रसिद्ध झाला. इस्लाम धर्मावरील त्यांचे महत्त्वाचे तात्त्विक विचार त्यात आलेले आहेत. त्यात त्यांनी आपले सूफीविरोधी आणि कर्मयोगाची शिकवण देणारे तत्त्वज्ञान मांडले आहे. 'जगातील सर्व मुसलमानांनी संघटित व्हावे व कुराणप्रणीत आचरण ठेवावे. राष्ट्रीयतेची भावना इस्लामला मारक आहे. पाश्चत्त्य संस्कृती निसर्गरहस्ये उलगडण्याची धडपड करीत असली, तरी तिला परमेश्वरी निष्ठेचे अधिष्ठान नाही. लोकसत्ताक पद्धती निरर्थक आहे, कारण तीत केवळ माणसे मोजली जातात, त्यांचे मूल्यामापन होत नाही.' अशी मते त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादिली आहेत. 'सारे जहाँसे अच्छाछ' यासारख्या ओळी सुरुवातीस लिहिणारे इक्बाल आता अशा ओळी कोरू लागले-

'चिनो अरब हमारा,
हिंदोसिताँ हमारा!
मुस्लीम हैं हम, वतन हैं
सारा जहाँ हमारा!!'

सर मुहम्मद इक्बाल हे सन १९३०मध्ये मुस्लिम लीगचे अध्यक्ष निवडले गेले आणि त्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची योजना मांडून ती कार्यान्वित होण्याची मागणी केली. त्यांच्या काव्यात तात्त्विक, धार्मिक, नैतिक, राजकीय विचारांचा मिलाफ व कलात्मक आविष्कार आढळतो. कवी व तत्त्वज्ञ अशा दोन्ही भूमिकांचा त्यांच्या काव्यात आविष्कार असल्यामुळे त्यांच्या काव्याबाबत टीकाकारांत तीव्र मतभेद आहेत. त्यांच्या काव्यावर आतापर्यंत अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले. मानवाच्या अमर्याद आत्मशक्तीवर त्यांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर दिलेली आढळते. स्वप्नरत?नाने आणि चारित्र्याने माणूस स्वतःचा विकास स्वतःच करू शकतो, अशी त्यांची धारणा होती. उर्दूपेक्षा त्यांचे फार्सी काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या काव्याला उर्दू फार्सीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांचे दुःखद निधन दि. २१ एप्रिल १९३८ रोजी झाले.

!! स्मृतिदिनी सर मुहम्मद इक्बाल यांना व त्यांच्या अचाट काव्यशैलीला मानाचा सॅल्युट !!

नंबर फ्लेट...

असे भारी नंबरी
नवी नंबर फ्लेट
धावपळ करावी
नको उगाचं लेट

उशीर होता जरा
दंड लावतील थेट
नाट्क रंगू लागले
आधीलावला सेट

डिलर सोबत कुठे
कसा झाला समेट
संशय पाणी मुरले
कुणाचे बरे सिमेंट

भड्कू लागे ग्राहक
कसे ओते घासलेट
पाचपंच्चीस रुपया
कशी लुटेलं इस्टेट

बोलू लागले काही
पोलिसभरतीलपेट
जराशी ठिणगीपडे
चौफेर परिसरा पेट

कधीहोई कारवाई
करुन पहा प्लॅचेट
मिडीया चर्चा रंगवे
चटकदार चॉकलेट

आपले कर्तव्य पूर्ण
?इजेस्ट करे बजेट
सोईसाठी सोईस्कर
मागत नाही फ्लॅनेट

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

आदेश...

आदेश
आला वरतून
चला आरोपी
पकडा
क्षणोक्षण हिशेब द्या
मागे लावला लकडा

अन्य कामे बास्तन्यां
नाचवे सतत माकडा
अलिखितसूचना येई
हातलावू नये धाकडा

वेळ पडली तर सरळ
बळी द्यायचे बोकडा
कुठला तपास सरळ
हा रस्ता वेडा वाकडा

मिडीयाकरे कीरकीर
रे गुन्हेगारांना जखडा
निदानालस्ती टिकेचा
आ वासलेला जबडा

स्पष्टकुणी का बोलेना
संशयित अति बोबडा
लागेबांधे पक्षा सोबत
दिसतोसर्वांस भाबडा

नेई कसा तपास पुढे
पाय ओढतो खेकडा
नकार देणे शक्यनसे
धारिष्ट नसते भेकडा

दिसते अ कार्यक्षमता
कसा दाखवी मुखडा
समोरनाचतो गुन्हेगार
कुणा सांगावा दुखडा

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर्जेदार आरोग्यसेवा दुर्गम भागांपर्यंत पोहोचवा :मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : आरोग्यसेवेच्या सुविधांसाठी महाराष्ट्र एक महत्त्वपूर्ण केंद्र बनले आहे. राज्यात सर्व प्रकारच्या दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध आहेत. ही गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा समाजाच्या शेवटच्या टोकावर, अतिदुर्गम भागात राहणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी डॉक्टरांची, तज्ज्ञांची मदत आवश्यक असून आजच्या तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण या शेवटच्या व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवू शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत २२ व्या मुंबई लाईव्ह इंडोस्कोपी अवॉर्ड २०२५ चे वितरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ.अमित मायदेव, डॉ.तरंग ग्यानचंदानी, देश विदेशातील डॉक्टर्स आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, देशातील प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळणे अत्यंत गरजेचं असून दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये महाराष्ट्रात दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात डॉक्टरांची व आरोग्य सेवकांची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

इंडोस्कोपी क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या डॉक्टरांचा यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला आहे. यात महाराष्ट्रातील डॉ.राधिका चव्हाण यांना 'वूमन इन इंडोस्कोपी' अवॉर्ड, चंडीगड येथील डॉ. सुरेंदर राणा यांना 'इंडोस्कोपी एज्युकेटर' अवॉर्ड, ओडिशाचे डॉ.आशुतोष मोहपात्रा यांना 'लीडर फ्रॉम टायर २/३ सिटीज' अवॉर्ड, राजस्थानचे डॉ.मुकेश कल्ला यांना 'लीडरशिप' अवॉर्ड, चंडीगड येथील डॉ.जयंत सामंता यांना 'इम्पॅक्टफुल पब्लिकेशन' अवॉर्ड, महाराष्ट्राचे डॉ.अमोल बापये आणि तेलंगणा येथील डॉ.मोहन रामचंदानी यांना 'टेक्निकल स्कील' अवॉर्ड आणि महाराष्ट्राचे डॉ.प्रवीण सूर्यवंशी यांना 'इंडोस्कोपी फॉर सर्जन' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संरक्षण सामग्री उत्पादनांमध्ये देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

वृत्तसंस्था ■ छ.संभाजीनगर



छत्रपती संभाजीनगर : उद्योगासाठी उत्तम परिसंस्था असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील उद्योजक धाडसी व कल्पक आहेत. येथे डिफेन्स क्लस्टर तयार करून त्यांच्यातील क्षमतांना चालना द्यावी, अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना केला. मराठवाडा:आत्मनिर्भर भारत की रक्षाभूमी', याविषयावर चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज अँड अग्रीकल्चर तर्फे आयोजित चर्चासत्रात श्री.फडणवीस बोलत होते.

संरक्षण सामग्रीसाठी लागणाऱ्या उत्पादनांची आयात कमी करून देश आत्मनिर्भर होत आहे. सद्यस्थितीत ५०० हून अधिक उत्पादने देशातच बनविले जात आहेत. संरक्षण सामुग्री निर्मिती क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. त्यात छत्रपती संभाजीनगरच्या धाडसी उद्योजकांना सामावून घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उद्योजकांच्या शिष्टमंडळाने दिल्लीला पुढील चर्चेसाठी यावे, असे आवाहन करत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी येथील उद्योजकांना निमंत्रण दिले.

येथील हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे आयोजित या चर्चासत्रास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राजस्थान चे राज्यपाल हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पणन मंत्री जयकुमार रावल, इतर मागास वर्ग कल्याण व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, खा. डॉ. भागवत कराड, आ. नारायण कुचे, आ. अनुराधा चव्हाण, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्री ?ण्ड ?ग्रीकल्चरचे अध्यक्ष अर्पित सावे, सचिव अथर्वेशराज नंदावत तसेच उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वृक्ष पूजन करून चर्चासत्राचा प्रारंभ करण्यात आला.

डिफेन्स क्लस्टर विकसित करावे-मुख्यमंत्री फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राचे उद्योग मॅग्नेट आता छत्रपती संभाजीनगर होत आहे. औद्योगिक वसाहतीसाठी संपादित केलेले १० हजार एकर क्षेत्र उद्योगांना वितरित झाले असून उद्योजकांकडून अजून मागणी होत आहे. त्यामुळे आणखी ८ हजार क्षेत्र उद्योगासाठी देण्याचे नियोजन आहे. येथे उत्तम उद्योग परिसंस्था आहे. मनुष्यबळ, दळणवळण, ऊर्जा अशी सर्व उपलब्धता आहे. त्यामुळे उद्योजक छत्रपती संभाजीनगरची निवड करतात. येथे आलेले उद्योजक येथलेच होऊन जातात

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ईलेक्ट्रिक वाहन निर्मिती उद्योगात छत्रपती संभाजीनगर अग्रणी आहे. येथील धाडसी व काही करू पाहणाऱ्या या उद्योजकांचा संरक्षण सामुग्री निर्मिती उद्योगात पुढे येण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सकारात्मकता दर्शवावी. त्यांना प्रोत्साहन द्यावे. येथे देशातील ऑटो क्लस्टर विकसित झाले त्याचप्रमाणे डिफेन्स क्लस्टर तयार करावे. संरक्षणसामुग्री उत्पादन उद्योगात अमर्याद संधी आहेत. आणि छत्रपती संभाजीनगरमधील उद्योजकांत पूर्ण क्षमता आहेत. त्याला चालना देण्यासाठी येथे डिफेन्स क्लस्टर विकसित करण्यासाठी चालना मिळावी, असे आवाहन श्री. फडणवीस यांनी केले.

उद्योजकांच्या धाडस व तळमळीचे कौतुक-संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, येथील उद्योजकांच्या धाडसाचे कौतुक करायला हवे. संरक्षण उत्पादनांच्या उद्योगात भारत आत्मनिर्भर व्हावा, ही आपल्यातील तळमळ कौतुकास्पद आहे. आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी आम्ही कटीबद्ध, वचनबद्ध आहोत. आणि त्यात देशाला यश मिळत आहे. देशात उत्पादीत संरक्षण सामुग्री आता आपण निर्यात करू लागलो असून ही निर्यात आपण ६०० कोटी वरून २४०० कोटी पर्यंत वाढवली. संरक्षण क्षेत्रात लागणारी ५०० हुन अधिक उत्पादने देशातच बनवण्याचे आमचे धोरण आहे. आयात कमी करून ३ लाख कोटी पर्यंत संरक्षण उत्पादने वाढविण्याचे नियोजन आहे, असे त्यांनी सांगितले.

श्री. सिंह म्हणाले की, येथील उद्योग परिसंस्था उत्तम असल्याचे दिसून येत आहे. आपल्या क्षमतांच्या सादरीकरणासाठी दिल्लीला यावे. असे त्यांनी सांगितले.

चर्चासत्रात प्रारंभी अध्यक्ष अर्पित सावे यांनी सादरीकरण करून डिफेन्स क्लस्टर साठी छत्रपती संभाजीनगर उत्तम व पोषक असल्याची भूमिका मांडली.

सादरीकरणातील महत्त्वाचे मुद्दे

छत्रपती संभाजीनगर हा औद्योगिकदृष्ट्या अग्रगण्य जिल्हा असून येथे ५ हजारांहून अधिक उद्योग आहेत. निर्यातीत २७ वा क्रमांक असून जीएसटी कर संकलनात राज्यात ४ था क्रमांक आहे. ३ लाख हून अधिक कामगार कर्मचाऱ्यांचे संरक्षण विमा योजनेत नोंदणी आहे. राज्याच्या एकूण उत्पादनाच्या २५ टक्के उत्पादन येथे होते. १० हजार एकर जागेवर स्थापित औद्योगिक वसाहत असून सर्व जागा उद्योगाना वाटप झाली आहे. येथे संरक्षण उत्पादने उद्योग परिसंस्था विकसित करण्यास वाव आहे. हा जिल्हा समृद्धी महामार्ग, रेल्वे, विमान वाहतूक सेवेने जोडलेला आहे. जालना ड्राय पोर्ट सुविधा जवळ आहे. येथे सप्ततारांकीत उद्योग सुविधा असून, वॉक टू वर्क कल्चर विकसित झाले आहे.

यांत्रिकी, पेट्रोलियम, फार्मास्युटिकल, इलेक्ट्रॉनिक्ससारख्या उद्योगांच्या तांत्रिक मार्गदर्शनासाठी व विकासासाठी अग्रगण्य प्रशिक्षण संस्था कार्यरत व सध्या अस्तित्वात आहेत. मराठवाडा ऑटो क्लस्टर, देवगिरी इले. क्लस्टर, मॅजिक स्टार्टअप इनक्युबेटरसारख्या उद्योगनिहाय पायाभूत सुविधा एकत्रितरित्या उपलब्ध आहे. सद्यस्थितीत इलेक्ट्रॉनिक्स, बॅटरी सिस्टीम, मिसाईल वहन व रडार तंत्र प्रणाली, मोटार वाहन व सैन्यदलाच्या आवश्यकतेनुसार वाहने निर्मिती (रणगाडे वगैरे) क्षमता आहे. आत्मनिर्भर भारत संकल्पनेत योगदान देण्यास येथील उद्योजक उत्सूक आहेत.

हवाई तंत्र व संरक्षण उद्योगात योगदान देण्यास सज्ज

याआधीच संरक्षण उद्योग कार्यान्वित असलेल्या नाशिक, अहिल्यादेवी नगर, पुणे आणि नागपूर या सर्व शहरांपासून समान अंतरावर आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे डिफेन्स पार्क म्हणून उद्योगांचे क्लस्टर करण्यास वाव.

बिडकीन अथवा आरापूर येथील औद्योगिक वसाहतीत स्थापन करण्याची सुविधा अथवा समृद्धी महामार्गालगत उद्योग उभारणीस वाव.

कृत्रिम बुद्धिमत्ता साहाय्याने सजीवांनी विचारी, विवेकी, सर्जनशील यांत्रिक मेंदू निर्माण करावेत :प्रा.अमीर इनामदार

खंडाळा ■ बाळू धायगुडे



खंडाळा (सातारा) : ज्ञानसंवर्धिनी शैक्षणिक संस्था शिरवळ येथे १९ एप्रिल २०२५ रोजी 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) शिक्षणात सर्जनशील वापर' या विषयावर शिक्षक-प्रशिक्षण द्विसत्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.यावेळी सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय,खंडाळा राज्यशास्त्र विभाग तथा कौशल्य विकास विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

प्रारंभी ज्ञानसंवर्धिनी शैक्षणिक संस्थेचे सचिव रमेश देशपांडे यांनी प्रा.इनामदार यांचा सन्मान केला,मुख्याध्यापिका एस.आर.क्षीरसागर यांनी अ?म्बीशन कॉम्पुटर्स शिरवळ चे संस्थापक पराग कदम यांचे स्वागत केले.कार्यशाळेत पिपीटी सादरीकरण आधारे शिक्षक वृंदाशी संवाद करताना प्रा.इनामदार म्हणाले- 'मानवी उत्क्रांतीचा पाया अश्मयुग असून सजीव माणसाने गरज आणि परिस्थितीनुसार शोध,प्रतिशोध नवनिर्मितीचे विविध शोध लावले.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे आधुनिक कालखंडात सजीव माणसांनी निर्जीव यंत्रात अडचणी,आव्हाने,अवघड समस्या निवारणासाठी स्व-बौद्धीक क्षमताआधारे भरलेल्या भावना आणि सूत्रे होय अशी व्याख्या करता येते.भारतात कृत्रिम बुद्धीमत्तेचा विकास कालखंड २०१२ ते आजपर्यंत असा मानला जातो.यंत्र निर्मितीत विचारी मानवी मेंदू संकल्पनेतून मानवी विकास याबद्दल उदाहरण म्हणजे उददुर्ती आणि श्मिदेदूर्ण्जत्दू टूल्स साहाय्याने मानवी मेंदू कृत्रिम बुद्धिमत्तेचा केंद्रबिंदू असून त्यामधून विविधांगी संकल्पना उदयास येतात,या संकल्पना यंत्रात भरवून त्याचा वेळ आणि गरजेनुसार वेगवान वापर करणे म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता होय. पारंपरिक शिक्षण पद्धतीला मागे टाकत भारतात कृत्रिम बुद्धिमत्ता संकल्पना अधिक विकसित होऊ लागली आहे. विचार,अभिव्यक्ती,सर्जनशीलता,स्वातंत्र्य या मार्गाने निर्जीव यंत्रात जीव आणण्यासाठी विचारी मानवी मेंदू काम करतो.कृत्रिम बुद्धिमत्ता मधील विविध उपयोगी चॅट बॉट,अल्दत्हुद आणि र्खेर्हेर्मेस्रू सारखी प्लॅटफॉम्स न्यूरल तंत्रज्ञान,समस्या सूत्रण तंत्र आयुधे र्ण्टूंदू ण्दजत्दू सारखे र्ंघ सहाय्यक प्रश्नोत्तर आणि संशोधन मदत होते.या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षक भावनिक जाणीवा वैचारिक संशोधन कमी वेळेत आणि वेगाने करू शकतात.

प्रा.इनामदार पुढे म्हणाले- वर्तमानकालीन शिक्षण प्रणालीत शिक्षकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्जनशील मार्गाने सातत्यपूर्ण प्रयोगातून वापर करणे गरजेचे आहे,भूतकाळापासून शिक्षकांचा प्रवास नैसर्गिक बुद्धिमत्तेआधारे यंत्राच्या मर्यादित वापरातून स्वयंपूर्ण होण्यापर्यंत झाला आहे,सद्यस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्तेला विद्यार्थ्यांमध्ये बिंबवणे प्रारंभी जड वाटणार यात शंका नाही परंतु,कृत्रिम बुद्धिमत्ता साहाय्याने सजीवांनी विचारी,विवेकी सर्जनशील यांत्रिक मेंदू निर्माण करून यंत्र आणि मानव यांनी एकमेकांचा विटाळ न करता वेळेनुसार समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहतील काळजी घ्यावी असे प्रा.इनामदार यांनी आवाहन केले.

अ?म्बीशन कॉम्पुटर्स चे संस्थापक पराग कदम यांनी- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या चॅट जिपिटी आयुध कौशल्यपूर्ण वापराबद्दल शिक्षकांना विस्तृत माहिती दिली.अवघड गणितीय संकल्पना कशा सोप्या करता येतात याचे प्रात्यक्षिक करून दाखवत एआय मधील विविध शासकीय आणि सुरक्षित अप्स बद्दल सखोल माहिती देत शंका निरसन केले.कार्यशाळेसाठी शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता-रोबोटिक्स मधील एज्युटेक-एजेफेक्स टेक्नोलॉजी या आंतरराष्ट्रीय कंपनीचे महाराष्ट्र प्रमुख मनोज यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यशाळेचे प्रास्ताविक,परिचय आणि उद्देश पर्यवेक्षक अजित गाढवे यांनी केले.मुख्याध्यापिका क्षीरसागर यांनी सर्वांचे आभार मानले.या कार्यशाळेसाठी ज्ञानसंवर्धिनी शैक्षणिक संकुलातील १२५ हून अधिक शिक्षकांनी सहभाग घेतला.

अनंत टोम्पे यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या; नागरिकांचा पाथरी तहसीलवर मूक मोर्चा

परभणी ■ वसंत आवटे



अमानुषपणे हत्या झालेल्या अनंत टोपे यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देऊन त्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याच्या मागणीसाठी पाथरी शहरातील नागरिकांनी तहसील कार्यालयावर सोमवार (दि० २१) रोजी मूक मोर्चा काढण्यात आला.सोमवार १४ एप्रिल रोजी दुपारी अडीच वाजता पाथरी येथील काही गुंड लोकांनी अनंत हरिभाऊ टोम्पे यांना त्यांच्या घरात घुसून बळजबरीने उचलून घेऊन त्यांचे अपहरण केले. त्यानंतर जवळपास दीड दिवसानंतर त्यांचा मृतदेह बाबा टावर येथील शौचालयात आढळला. या घटनेमुळे अनंता टोम्पेचे कुटुंब उघड्यावर पडले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुली व आई असा परिवार आहे. त्यांना स्वतःचे घर आणि उदरनिर्वाहाचे साधन नाही. त्यांची आई भोळसर आहे. ती काम करू शकत नाही. घरात पाच लहान मुली असल्यामुळे पत्नी कामाला जाऊ शकत नाही. यामुळे कुटुंबाचा जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा कठीण परिस्थितीत हत्या प्रकरणातील गावगुंडाचे नातेवाईक अनंता टोम्पे यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबाला धमक्या देत आहेत. पैशाचे अमिष दाखवत आहेत. आमचं कोणी काही करू शकत नाही. आमचे लोक निर्दोष सुटणार अशा अविर्भावात बोलत आहेत. भीती दाखवत आहेत. त्यामुळे पीडित कुटुंब भयभीत झालेले आहे. त्यामुळे अनंता टोम्पे यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवावे, त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, शासनाकडून मदत मिळवून देऊन कुटुंबाचे आर्थिक पुनर्वसन करावे, अशी विनंती तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात केली आहे.निवेदनावर सुनंदा फलके, विष्णू कुटे, राहुल पाटील, मनोज फलके, राजेश पाटील, पी. डी. पाटील, शेख शब्बीर शेख अजीम गौस, शहजाद लाला, अमोल भाले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. या मोर्चात पाथरी शहरातील सर्वधर्मीय नागरिक सहभागी झाले.

संत निरंकारी मिशनकडून मानव एकता दिवस ; फलटणसह देश-विदेशात ५०० ठिकाणी रक्तदान अभियान

लोणंद ■ पांडूरंग कुंभार

लोणंद : प्रतिवर्षाप्रमाणे २४ एप्रिल रोजी दिल्लीतील ग्राउंड नं. ८, निरंकारी चौक, बुराडी रोड येथे 'मानव एकता दिवस' समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त फलटणसह देश विदेशात ५०० ठिकाणी रक्तदान अभियान आयोजित करण्यात आले आहे.

देशभरातील मिशनच्या समस्त शाखांमधील भाविक भक्तगण देखील एकत्रित येऊन बाबा गुरबचनसिंहजी आणि मिशनचे अन्य भक्त चाचा प्रतापसिंहजींना श्रद्धा सुमने अर्पित करतील.

संत निरंकारी मंडळाचे सचिव व समाज कल्याण विभागाचे प्रभारी जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की, यावर्षी देखील जगभरातील ५०० पेक्षा अधिक ठिकाणी संत निरंकारी मिशनची शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाईल. ज्यामध्ये ५० हजारपेक्षा अधिक रक्तदाते सेवा देतील.

त्याच अनुषंगाने फलटण येथील सत्संग भावनात सकाळी ९ ते सायं. ५ यावेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात फलटण तालुक्यासह बारामती तालुक्याचाही समावेश असल्याचे सातारा झोनचे प्रभारी नंदकुमार झांबरे यांनी सांगितले.

कोरेगावात विना रोपांची कागदोपत्री लागवड झाल्याचा गंभीर आरोप, आंदोलनाचा इशारा

कोरेगाव ■ अज्जू मुल्ला



कोरेगावः कोरेगाव दिः सातारा- पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग निर्मितीसाठी अनेक वृक्षाची तोड करण्यात आली. त्या बदल्यात ३२ लाख वृक्ष रोप लागवड झाल्याचे कागदपत्र दाखवण्यात आले. ही शासनाची फसवणूक असून या कंपनीला काळया यादीत समाविष्ट करण्यासाठी व मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासाठी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राज्य उपाध्यक्ष श्री रमेश अनिल उबाळे यांनी सहा मे पासून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतल्याने तो एक चर्चेचा विषय बनला आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,मेघा इंजिनिअरिंग प्रा. लि. या कंपनीने सात हजार झाडे कागदावर नमूद करून शासनाची फसवणूक केली आहे.त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे. तसेच कोरेगाव व सातारा येथे झालेल्या अपघातात मृत्युमुखी पावलेल्या व्यक्तींना मोबदला मिळावा .कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावी. असेही नमूद केले आहे. सातारा- पंढरपूर विस्तारीकरण महामार्गावर नवीन काम करत असताना जुनी झाडं पाडून त्या जागी नवीन रोप लागवड करण्याचे महामार्गाच्या कामाच्या निविदांमध्ये नमूद केले होते, त्याप्रमाणे सात हजार वृक्ष रोपाची लागवड करणे. कंपनीला गरजेचे होते. त्यांनी निविदा सादर करताना करून ३२ लाख रुपये वृक्ष रोप लागवडी करता खर्च केलेले आहेत, असे कागदावर दाखवले आहे.

वास्तविक पाहता सातारा ते पंढरपूर महामार्गावर दुतर्फी झाडे लावणे व जगवणे असे निविदा मध्ये स्पष्ट नमूद केले होते, परंतु ,या कंपनीने दोन लाखाची वृक्षरोपाची लागवड करून तीस लाख न केलेल्या वृक्षरोपाची अहवालात मांडणी केली आहे. या भ्रष्ट कंपनीने निकृष्ट दर्जाचे महामार्गाचे काम केलेले असून, संपूर्ण महामार्गाला जागोजागी भेगा पडलेले बुजवण्याचं काम सध्या चालू आहे,

वृक्ष रोप लागवड ही कागदावर दाखवून सरळ सरळ शासनाशी फसवणूक व भ्रष्टाचार केलेला आहे. मेघा इंजीनियरिंग कंपनीने या महामार्गाचे काम करत असताना कोणत्याही पद्धतीचे सेफ्टी रुल्स फॉलो केलेले नाही. त्यामुळे या रस्त्यावर आजपर्यंत निरपराधी ६४ लोक मृत्युमुखी पावलेले आहेत. त्यांच्या कुटुंबियांना कोणत्याही पद्धतीचा नुकसान भरपाई च मोबदला मिळालेला नाही व पोलीस

यंत्रणेशी हात मिळवणी करून आज तारखे अखेर एक ही सदोष मनुष्य वधाचा गुन्हा या कंपनीवर का दाखल झालेला नाही? हा मोठा अभ्यास व संशोधन करण्याचा विषय आहे .

सर्व जाती धर्मातील ६४ लोक मृत्युमुखी पडले आहेत.फक्त आणि फक्त सेफ्टी नियमावलीचे पालन न करता आर्थिक बचतीच्या दृष्टिकोनातून काम केल्यामुळे सदर कंपनी विरोधात तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून संबंधितांना अटक करावी. या मागणीसाठी निवेदन दिलेले आहे . सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाची बाहेर दिनांक सहा मे रोजी अमर उपोषण करण्याचा इशारा दिलेला आहे. सदर उपोषणामुळे जर आंदोलकांच्या जीवित अस काही बरे वाईट झाल्यास त्याला सर्वस्वी मेघा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनी जबाबदार राहील. असे श्री रमेश अनिल उबाळे यांनी निवेदनात नमूद केले असून निवेदनाच्या प्रती सातारा जिल्हा अधिकारी व उपविभागीय अधिकारी कोरेगाव तसेच कोरेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या आहे.

भिम जंयतीला का गेला? म्हणुन वीटभट्टी चालकाची मजुराला मारहाण; आरोपीला अटक करण्यासाठी जनतेचे निवेदन

हिंगोली ■ रुपेश एंगडे



हिंगोली : वसमत तालुक्यातील मौजे पांगरा शिंदे येथील मातंग समाजातील एक कूटूंब विटभट्टी चालकाकडे कामाला होते. हे कुटूंब भिमजयंतीला गेल्यामुळे विटभट्टी मालकाने मजुराला मारहाण केली त्याचा निषेध करत पांग्राशिंदे सर्कल मधील सर्व समाज बांधवाने उपविभागीय पोलिस अधिकारी यांना त्या कुटूंबातील सदस्यांना न्याय मिळावा म्हणून निवेदन देण्यात आले आहे. पांग्रा शिंदे येथील मातंग समाजाचे ज्ञानेश्वर ऊर्फ पिंटू जोगदंड व त्याचे कूटूंब हे उदरनिर्वाहासाठी विटभट्टी मालकाकडे कामावर होते. १४ एप्रिल रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असल्यामूळे हे कुटुंब जयंतीसाठी वसमत शहराच्या ठिकाणी गेले होते. सायंकाळी उशिरा घरी पोहचले दूसऱ्या दिवशी सकाळी विटभट्टी मालकाने मारहाण केली व जातीवाचक शिविगाळ केल्याची तक्रार जोगदंड कुटूंबियानी विटभटीचालका विरुद्ध पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. त्यावर पोलीस प्रशासनाने आरोपीला तात्काळ अटक करण्याची कारवाई करावी म्हणुन पांगरा शिंदे सर्कल मधील जनतेने उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन दिले आहे. यावेळी विजय शिंदे,भगवान शिंदे ,यशवंतराव लेकुळे,महेश होडगिर,प्रशांत शिंदे, आशिष नलगे, डॉ.नागोराव जांबुतकर, रमेशराव दळवी, काळूराम कुरडे,बाबासाहेब शिंदे, माधव गिरी,नागोराव शिंदे ,परमेश्वर शंखपोळे ,विठ्ठल टेकाळे, शिवाजी गायकवाड, ज्ञानेश्वर शिंदे , विठल शिंदे,संतोष शिंदे भूषन शिंदे अदि कार्यकर्ते उपस्थित होते.

पतसंस्था व मल्टीस्टेच्या अडचणी सोडवण्याकरिता मंत्र्यांना निवेदन ; संचालक ॲड. रविंद्र कानडे यांनी मांडल्या संस्थांच्या व्यथा

माजलगाव ■ दर्शन डोंगरे

सहकार मंत्र्यांनी घेतली तात्काळ दखल ; तातडीने बोलावली बैठक



माजलगाव : येथील लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेच्या तेलगाव शाखेच्या च्या नवीन वास्तू उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री श्री बाबासाहेब पाटील हे दिनांक २१ एप्रिल रोजी आले असता पतसंस्था व मल्टीस्टेच्या अडचणी सोडवण्याकरिता सहकार मंत्र्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन चे संचालक ?ड. रविंद्र कानडे यांनी सविस्तर निवेदन दिले यावर विचार नक्कीच करू असे आश्वासन सहकार मंत्र्यांनी दिले आहे.

महाराष्ट्र राज्यातील पतसंस्था व फेडरेशन यांच्या कायद्यामध्ये आवश्यक तो बदल व्हावा वसुली कायदे यामध्ये देखील सुधारणा व्हावी कलम १०१,१५६, व विक्री अधिकारी यांच्या कायद्यामध्ये सुधारणा होऊन भक्कमपणे संस्थांना काम करता यावे तसेच संस्थेच्या गुंतवणुकी बाबत सुरक्षितता तसेच सभासदांच्या ठेवीना विमा संरक्षण मिळावे त्याचबरोबर योग्य कर्जदार सभासद निवडता यावा करिता सिबिल सारख्या कंपन्या संस्थांना जोडता याव्यात व सहकार समृद्ध होण्यासाठी आवश्यक त्या सर्व इतर बाबींच्या सुधारणा करण्यासंदर्भातले सखोल मागण्यांचा उल्लेख या निवेदनात करण्यात आला असुन प्रसंगी राज्याचे सहकार मंत्री यांनी देखील सहकारात्मक भूमिका घेऊन सर्व प्रश्न सोडवण्यासाठी सरकार निश्चितच काम करेल असे आश्वासन दिले यावेळी आ. प्रकाशदादा सोळंके , जिल्हाधिकारी अविनाश पाठक , उपजिल्हा निबंधक समृद्ध जाधव यांच्या समवेत निवेदन सादर करण्यात आले.

सहकार मंत्र्यांनी घेतली तात्काळ दखल;तातडीने बोलावली बैठक

निवेदनाची तात्काळ दखल घेऊन मंत्री बाबासाहेब पाटील यांनी तात्काळ फेडरेशनचे पदाधिकारी आणि मंत्रालयीन अधिकारी यांची दि. २३ रोजी बैठक बोलावली असल्याची माहिती फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी दिली.

रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये वाहन पार्किंग संदर्भात पोलीस व कंपनी प्रतिनिधींची बैठक संपन्न

रांजणगाव गणपती ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपतीः शिरूर तालुक्यातील रांजणगाव - कारेगाव एमआयडीसी लगत असणाऱ्या ढोकसांगवी गावातील कैलास चंदर पाचंगे, यांचा दि. १८ फेब्रुवारी २०१८ रोजी अपघात झाला होता. त्यात त्यांच्या डोक्याला व मेंदूला जबर मार लागल्याने, त्यांना पुणे येथील जहांगीर हॉस्पिटल येथे दाखल करून उपचार करण्यात आले होते. त्यात त्यांना बारा लाख रुपये खर्च झाला होता. हा अपघात होण्याचे कारण म्हणजे, झामील स्टील इंडस्ट्रीज या कंपनीत आलेला ट्रक हा नो पार्किंगमध्ये उभा केलेला होता. त्याला रेडियम व रिफ्लेक्टर नसल्याने हा अपघात झाल्याचा आरोप संबंधितांनी केलेला होता. असे अपघातांचे प्रकार त्या अपघातापासून अनेकदा झालेले होते. त्यामुळे आमच्याबाबत जो अपघाताचा प्रकार झाला, तसा इतरांबाबत होऊ नये व बाकीच्यांना रुग्णालयाचा आर्थिक भुर्दंड होऊ नये, यासाठी पाचंगे कुटुंबीयांनी १ सप्टेंबर २०२१ रोजी एमआयडीसी कडे तक्रार अर्ज दिलेला होता. त्यानुसार एमआयडीसी कार्यालयाने रांजणगाव पोलीस स्टेशनला ६ सप्टेंबर २०२१ रोजी पत्र देत संबंधित अवैध्यरीत्या पार्किंग केलेली वाहने आढळून आल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यास सांगितले होते.

त्यानंतर अपघातग्रस्त कैलास पाचंगे यांचे बंधू व भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोशचे अध्यक्ष काशिनाथ पाचंगे यांनी शिरूर तहसीलदारांना निवेदन देत आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यामुळे तत्कालीन तहसीलदार यांनी संबंधित पोलिस स्टेशनला या तक्रारीची दखल घेण्यास सांगत, संबंधित बेशिस्त वाहनांवर कडक कारवाई करण्यास १७ मार्च २०२२ रोजी दिलेल्या पत्रात सांगितले होते. परंतु तरीही तशी कारवाई न झाल्याने संघटनेच्या वतीने काशिनाथ पाचंगे, महीलाध्यक्षा प्रियंका जगताप व इतर पदाधिकाऱ्यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देत, त्यांच्या कार्यालयाबाहेर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाने या आंदोलनाची परवानगी नाकारत पुन्हा तहसीलदार व एमआयडीसी कार्यालय, तसेच पोलीस स्टेशनला त्यांच्या पातळीवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

मात्र वेळोवेळी संबंधित सर्व कार्यालयांना पत्र देत, प्रत्यक्ष भेटी व बैठका होऊनही, अद्याप २०२५ उजाडले तरीही संबंधित कंपन्यांनी, त्यांच्या अवजड वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न न मिटवल्याने शेवटी ढोकसांगवी ग्रामस्थांनी व ग्राम पंचायतच्या ग्रामसभेत, दि. ०७/०७/२०२३ रोजी या वाहनांच्या अवैध्य पार्किंगचा प्रश्न मांडत ठराव संमत केलेला होता.

त्यानंतरही हा प्रश्न न मिटल्याने व दरम्यानच्या काळात पुन्हा बे एके बे सुरू राहिल्याने व आम्हा ढोकसांगवी ग्रामस्थांना न्याय न मिळाल्याने, पुन्हा संबंधित सर्व कार्यालयांना पत्रव्यवहार आम्ही केले आहेत असे पाचंगे यांनी सांगितले. त्यानंतर पुन्हा ग्राम पंचायतचा ग्रामसभेत ०३/०२/२०२५ रोजी ठराव घेण्यात आला.

त्या अनुषंगाने शुक्रवार दि. १८/०४/२०२५ रोजी रांजणगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी संबंधित कंपनीचे प्रतिनिधी व तक्रारदारांची बैठक घेतली. त्यास झामील स्टील, बेजल, गृपो अँटोलीन, फियाट, टाटा स्टील ई. कंपनी प्रतिनिधी उपस्थित होते. आता या बैठकीनंतर नेमक्या काय कारवाया होतील ? हे पाहणे गरजेचे आहे.

दरम्यान याबाबत रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी सांगितले की, 'काशिनाथ पाचंगे व प्रियंका जगताप यांनी पोलीस स्टेशनला दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी पार्किंग संदर्भात निवेदन दिले होते. त्यास ढोकसांगवी ग्रामपंचायतचा ग्रामसभेचा ठराव लावलेला होता. या ठरावात असे नमूद केले होते की, टाटा चौक ते ढोकसांगवी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील वाहनांच्या पार्किंगची समस्या निर्माण होत आहे, त्याबाबत कार्यवाही होणेबाबत सांगितलेले होते. त्यानुसार आम्ही आज शुक्रवार दि. १८ एप्रिल २०२५ रोजी, संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्या समक्ष बैठक घेतली असून, या बैठकीस उपस्थित प्रतिनिधींना पार्किंगबद्दल सूचना करून, जर चुकीच्या दिशेने गाड्यांची वाहतूक आढळली, अपघातास कारणीभूत अशा प्रकारच्या वाहनांच्या पार्किंग आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, तसेच संबंधित कंपन्यांनी त्यांच्या पार्किंगसाठी पार्किंग मार्शल ची व्यवस्था करावी, कंपनीच्या गेट पासून ठराविक अंतरापर्यंत वाहने लावू नयेत. शेजारील गावांमध्ये जाणाऱ्या येणाऱ्या ग्रामस्थांच्या वाहनांना अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. अशा सूचना य बैठकीत संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींना देण्यात आलेल्या आहेत.

बेशिस्त वाहन चालकांनी वाहन पार्किंग करून अनेक वेळा अपघात झाले असून त्यावरती उपाय म्हणून यापुढील काळात अशा वाहन चालकांना शिस्त लागण्यासाठी कठोर कारवाई व्हावी या पुढील काळात रस्ते खुले करून अपघात टाळावे जर बेशिस्त वाहन चालकांना लगाम लागला नाही तर आमरण उपोषणाचा पर्याय अवलंबला जाईल- काशिनाथ पाचंगे(भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश मोर्चा) / प्रियंका ताई जगताप

झोपेचे सोंग करणाऱ्या 'ममता सरकार बरखास्त करा' : रामदास तडस

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा-पश्चिम बंगाल मध्ये वक्फ विधेयकाला विरोध करण्यासाठी आंदोलनाने रक्तपाताचे स्वरूप घेतलेले आहे. त्यामुळे देशात या सर्व घडामोडी घडत असताना पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी वक्फ कायद्याविषयी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पश्चिम बंगालमध्ये हा कायदा लागू होणार नाही असं त्यांनी स्पष्ट केलं असताना याचे प्रतिसाद आता पश्चिम बंगाल सोबतच संपूर्ण देशात पाहायला मिळतात आहे.

त्यामध्ये गेल्या काही दिवसांपूर्वी पश्चिम बंगाल येथील मुर्शिदाबाद येथे या कायद्याच्या विरोधात हिंसक वळण नागरिकांनी घेतलेले आहे ज्यामध्ये अनेक हिंदू नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू देखील झालेला आहे. याचबरोबर तेथील महिलांवर अत्याचाराचेही प्रमाण ही वाढलेले आहे.

यावर 'झोपेचे सोंग करत असलेली ही ममता सरकार त्वरित बरखास्त करा अशी मागणी वर्धा लोकसभेचे माजी खासदार रामदास तडस यांनी केली आहे. काल विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व भारतीय जनता पक्षाच्या संयुक्त विद्यमानाने छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आलेल्या जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले याच बरोबर भव्य बाईक रॅली च्या माध्यमातुन संपूर्ण शहरात या विषयाच्या संदर्भात जनजागृती करून पश्चिम बंगाल येथील स्थायी सरकार त्वरित बरखास्त करून यावर केंद्र सरकार च्या रक्षा दलाचे नियंत्रण प्रभावित क्षेत्रामध्ये देण्यात करिता भारताच्या महामहीम राष्ट्रपतींकडे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले.

एकीकडे पश्चिम बंगाल जळत असताना पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री झोपेचं सोंग करत आहे आणि या झोपेचे सोंग करणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या मंत्र्यांच्या नेतृत्वातील सरकार हे त्वरित बरखास्त होणे अत्यंत गरजेचे आहे तसेच तिथे केंद्रीय पोलीस बल तैनात करून हिंदू धर्मातील नागरिकांच्या संरक्षणासाठी केंद्रीय सुरक्षा बलाला तैनात करण्यात यावे अशी मागणी माजी खासदार रामदास तडस यांनी केली.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री या बांगलादेशातील रोहिंगे व विस्थापित मुस्लिमांच्या मदतीने हिंदू धर्माच्या नागरिकांवर वारंवार अत्याचार करण्याचा बंगाल ला जुना इतिहास लाभलेला आहे. अश्या मुख्यमंत्री एका राज्यासाठीच नाही तर संपूर्ण मानवतेसाठी धोका आहे त्यामुळे या सर्व हिंसाचाराला जवाबदार असलेल्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना जेरबंद करून त्यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायदा अंतर्गत त्यांच्यावर लागू करा अशी मागणी ही भाजपचे जिल्हाध्यक्ष सुनील गफाट यांनी केली.

या निषेध मोर्चाचे आयोजन विश्व हिंदू परिषद चे जिल्हाध्यक्ष अटल पांडे यांच्या द्वारे करण्यात आले होते.

या निषेध मोर्चाला दीपक चुटे, गणेश ऑस्ट्रेकर, किरण उपाध्याय, अनिल कावड़े, संजय बढ़गेलवाल, शैलेश देहाद्राय, आकाश राजुरकर, मनोज मुरारका, अरविंद कोकाटे, अश्विन साहू, योगेश साहू, हरीश गांधी, धर्मेंद्र मुंदडा , निलेश मुंजे, महेश राउत वंदना चाफले, अनुराधा महाकालकर, व भाजप चे निलेश किटे, प्रणव जोशी, श्रीधर देशमुख, श्रेया देशमुख, कमल जी कुलधरीया, जयंत कावळे सचिन जी लिखीतकर. उपस्थित होते

देवळी परिसरात माकडांचा उद्रेक ; जामणीच्या युवकाचा पाय मोडला वनविभागाकडून माकडांचा बंदोबस्त करण्याची नागरिकांची मागणी

देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर



देवळी : वाढत्या जंगल कटाई मुळे गेल्या दहा वर्षांपासून माकडांचा मोर्चा शहरासोबतच गावखेड्याकडे वळला आहे, हल्ली देवळी परिसरात तथा ग्रामीण भागातील गावोगावी माकडांचा ठिय्या असल्याचे दिसून येते, या माकडांचा उच्छाद वाढल्याने गृहिणी त्रस्त झाल्या, माकडे आतापर्यंत महिलांच्या अंगावर धावून जात होते, व पुरुषांना घाबरत होते,पण आता पुरुषांच्याही अंगावर धावून जात असल्याचे नजीकच्या जामनी येथे दिसून आले, जामनी येथील तिस वर्षीय तरुण हा शुक्रवारी सकाळी आपल्या घराच्या स्लॅबवर उच्छाद करत असणाऱ्या माकडांना हाकलून लावण्यासाठी गेला असता यातील दोन माकडे त्याच्या अंगावर धावून आले, यामुळे त्याने थेट जमिनीवर उडी घेतली यामुळे त्याचा पाय फॅक्चर झाला, याशिवाय दोन दिवसांपूर्वी एका माकडाने येथील एका महिलेच्या कानशिलातही लगावली, यामुळे जामणीसह परिसरात महिलांसह पुरुषांमध्ये कमालीची दहशत निर्माण झाली आहे, यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरत आहे,

दिवसेंदिवस गावखेड्यात वाढत चाललेल्या माकडांच्या उच्छादाने महिला चांगल्याच त्रस्त झाल्या आहेत. वन विभागाने गावात धुडगूस घालणाऱ्या माकडांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

जंगलात आता झाडांची कत्तल झाल्याने माकडांनी आता गावाकडे चला, असा पवित्रा घेतला आहे. मोठ्या संख्येने माकडे गावात मुक्कामी राहू लागली आहेत आणि स्वभावधर्माप्रमाणे उच्छाद मांडत आहेत. या प्रकाराने महिलांची चांगलीच कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात खराब होऊ नये म्हणून महिला उन्हाळ्याच्या दिवसात डाळ व कडधान्य वाळवून घेतात. तसेच पापड, कुरडया, विविध प्रकारच्या डाळीच्या वड्या तयार करून घराच्या छतावर वाळण्यासाठी ठेवतात. मात्र, सध्या शहरात सुरू असलेल्या माकडांच्या उच्छादाने महिला यापैकी काहीही करू शकत नाहीत. इच्छा नसतानाही महिलांना हे सारे जिन्नस दुकानांमधून विकत घ्यावे लागत आहेत. वन विभागाने यासंदर्भात पुढाकार घेऊन या माकडांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे,

दौलावडगाव येथील पिरबाबा यात्रा नियोजन बैठक संपन्न



आष्टी ■ आदिनाथ ठोंबरे

आष्टी : सालाबादप्रमाणे याही वर्षी जागृत ग्राम दैवत हजरत सय्यद नशिरूद्दीन शहा रहै. अलै या पिराची तिथी नुसार बुधवारी ३० एप्रिल रोजी जंगी संदल मिरवणूकीतून यात्रेची सुरुवात होणार आहे. गुरूवार १ मे रोजी यात्रा छबीना मिरवणूक आणि शुक्रवार २ मे रोजी जंगी कुस्त्यांचे फड, कव्वाली आदी पारंपरिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजनासाठी आज २० एप्रिल रोजी ग्रामदैवत प्रांगणात बैठक संपन्न झाली.

आष्टी तालुक्यातील दौलावडगाव येथील पिरबाबा उर्स सर्व धर्मीय समाजातील लोकांचे श्रद्धेचे स्थान आहे. नोकरी-व्यवसायसाठी बाहेर गावी गेलेली माणसं यात्रेनिमित्त गावी येतात त्याच बरोबर महाराष्ट्र भरातून पाहूणेराऊळे यात्रेसाठी आलेले असतात हेच पाऊणे आपल्या गावच नाव घेऊन जातात यासाठीच आपल्या गावचं भूषण यात्रा चांगली व्हावी म्हणून या वर्षी काही नियम करण्यात आले आहे. छबीना मिरवणूकीत देवाला चढ होऊ नये म्हणून कुणीही कुणाला डोक्या खांद्यावर घेऊन नाचू नये असे करणाऱ्यांकडून पाच-पाच हजार रुपये दंड वसूल केला जाईल असे सर्वानुमते यात्रा कमिटी कडून निर्णय घेण्यात आला. यावेळी गावातील प्रतिष्ठित मान्यवरांसह नागरिक उपस्थित होते. याची सर्व भाविक भक्त ग्रामस्थांनी नोंद घ्यावी. हे सर्व कार्यक्रम जास्तीत जास्त चांगले होण्यासाठी गावातील युवकांनी सहकार्य करावे आणि ग्रामस्थांनी आपली लोकवर्गणी प्रती व्यक्ती २५० रूपये लवकरच मारूती मंदिराच्या सभामंडप येथे यात्रा कमिटी कडे जमा करावी असे आवाहन दौलावडगाव ग्रामपंचायत व यात्रा कमिटी कडून करण्यात आले.

राष्ट्रीय जनसंपर्क दिनानिमित्त २२ व २३ रोजी कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर : जनसंपर्काची भूमिका विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र

माध्यम शिक्षक, जनसंपर्क अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, विद्यार्थी राहतील उपस्थित

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात महाराष्ट्र सरकारचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूर, विद्यालयाचा जनसंपर्क विभाग व जनसंपर्क कार्यालय तसेच पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया, वर्धा चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने २२ व २३ एप्रिल रोजी कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर : जनसंपर्काची भूमिका या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन २२ एप्रिल रोजी गालिब सभागृहात सकाळी ११ वाजता कुलगुरू प्रोफेसर कुमुद शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येईल. याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून वर्धा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अनुराग जैन, विशिष्ट अतिथी म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूरचे संचालक डॉ. गणेश मुळे पीआरएसआय पश्चिमचे उपाध्यक्ष एस पी सिंह, नागपूर तसेच कुलसचिव प्रो. आनंद पाटील उपस्थित राहतील.

मानविकी व सामाजिक विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. फरहद मलिक स्वागत भाषण देतील तर जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे विषय प्रवर्तन करतील. चर्चासत्राचे संयोजक जनसंचार विभागाचे असोसिएट प्रोफेसर डॉ. राजेश लेहकपुरे तर सह संयोजक वर्धा जिल्हा माहिती अधिकारी रवी गीते व विश्वविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी बी.एस मिरगे असतील. चर्चासत्रात जनसंपर्क अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, माध्यम शिक्षक व विद्यार्थी सहभाग घेतील.

या चर्चासत्रात मीडिया व जनसंपर्कात एआयची उपयोगिता, शिक्षणाच्या विकासात एआयची उपयोगिता, एआयचा प्रयोग : नैतिकता व संकट प्रबंधन, सायबर सुरक्षा आणि एआय या विषयांवर विचार विनिमय करण्यात येईल.

चर्चासत्राचा समारोप बुधवार २३ एप्रिल रोजी दुपारी ४:४० वाजता कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली होईल. याप्रसंगी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूरचे संचालक डॉ. गणेश मुळे, सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी संजय इंगळे तिगावकर विशिष्ट अतिथी असतील तर जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे यांची विशिष्ट उपस्थिती राहील.

उद्घाटनानंतर २२ एप्रिल रोजी मीडिया व जनसंपर्क यात एआयची उपयोगिता या विषयावर जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्रात माहिती व जनसंपर्क संचालनालय नागपूरचे संचालक डॉ. गणेश मुळे विशिष्ट वक्ता असतील तर आयआयआयटी नागपूरचे असोसिएट डिन तौसीफ दिवाण विषय तज्ज्ञ म्हणून संबोधित करतील. सत्राचे संचालन जनसंचार विभागाचे सहायक प्रोफेसर डॉ. संदीप वर्मा करतील तर पीआरएसआय वर्धा चॅप्टरचे उपाध्यक्ष प्रफुल दाते आभार मानतील. दुपारी तीन वाजता शिक्षणाच्या उत्थानात एआयची उपयोगिता या विषयावर हिंदी विविचे शिक्षण विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. गोपाल कृष्ण ठाकूर यांच्या अध्यक्षतेतील सत्र होईल. यावेळी आयआयआयटी नागपूरचे सहाय्यक प्रोफेसर डॉ. शिशुपाल कुमार, हिंदी विविचे लीला विभागाचे प्रभारी डॉ. अंजनी कुमार राय संबोधित करतील. संचालन जिल्हा माहिती अधिकारी रवी गीते करतील तर पीआरएसआयचे कोषाध्यक्ष विनेश काकडे आभार मानतील.

बुधवार २३ एप्रिल रोजी तृतीय अकादमी सत्र अकरा वाजता एआयचा प्रयोग : नैतिकता व संकट प्रबंधन या विषयावर होईल. अध्यक्षस्थानी डॉ. गणेश मुळे राहतील. यावेळी आयआयआयटी नागपूरचे असोसिएटेड कौशिक दिवाण व डॉ. अंजनी कुमार राय संबोधित करतील. ? संचालन विनेश काकडे करतील तर वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी प्रवीण गावंडे आभार मानतील. ? चतुर्थ प्राथमिक सत्र दुपारी तीन वाजता सायबर सुरक्षा व एआय या विषयावर होईल. ? सत्राच्या अध्यक्षस्थानी हिंदी विविचे विधी विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. जनार्दन कुमार तिवारी राहतील. याप्रसंगी डॉ. शिशुपाल कुमार व हिंदी विविचे मुख्य सूचना सुरक्षा अधिकारी डॉ. गिरीश चंद्र पांडे विचार मांडतील. सत्राचे संचालन प्रफुल्ल दाते करतील तर हिंदी विवीचे सहायक संपादक डॉ. अमित विश्वास आभार मानतील.

या चर्चासत्रात उपस्थित राहण्याचे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर विश्वविद्यालयाचा जनसंपर्क विभाग व जनसंपर्क कार्यालय तसेच पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया वर्धा चॅप्टर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्नेहल पालकर आणि अवनी कोळी झाले 'साई सन्मान' पुरस्काराने सन्मानित

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे



उरण : श्री साई देवस्थान साईनगर, वहाळ तर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा साई सन्मान पुरस्कार क्रीडा क्षेत्रातील अविस्मरणीय कामगिरीबद्दल स्नेहल राम पालकर आणि कु.अवनी अलंकार कोळी यांना प्रदान करण्यात आला. राज्य, राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. स्नेहल राम पालकर यांनी ?थलेटिक्स स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक प्राप्त केले. त्यांना केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था, श्री समर्थ कृपा स्पोर्ट्स अकॅडमी दादरपाडा, कायझन स्पोर्ट्स अकॅडमी खोपोली यांचे मार्गदर्शन लाभले आहे. कू. अवनी अलंकार कोळी हिने नेमबाजी डबल ट्रॅप शूटिंग स्पर्धेत राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे. तिला सिद्धांत रायफल शूटिंग क्लब चे मार्गदर्शन लाभले आहे.

सदर पुरस्कार मिळाल्यानंतर दोघांनीही हा पुरस्कार कुटुंबीय, शुभचिंतक आणि वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या सहकाऱ्यांना समर्पित केला असल्याची भावना व्यक्त केली. तसेच यापुढे देखील कामगिरीचा आलेख उंचावत ठेवून आणखी नवे खेळाडू घडविण्याची इच्छा व्यक्त केली. या प्रसंगी साई देवस्थान वहाळ चे संस्थापक रविशेठ पाटील, महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर, पार्वतीताई पाटील, राणी मुंबईकर तसेच समाजातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर, साईभक्त उपस्थित होते.

वाल्मिकी समाज आयोजित महिला क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न

उरण मध्ये प्रथमच महिलांना क्रिकेट स्पर्धेत प्राधान्य; महिलांमध्ये आनंदाचे वातावरण

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे



उरण : उरण वाल्मिकी समाजाच्या वतीने (मोरा रोड सिद्धार्थ नगर) येथे प्रथमच मुली आणि महिला यांच्या साठी बॉक्स टाईप क्रिकेट चे सामने भरवण्यात आले या सामन्यात मोठ्या प्रमाणात मुली आणि महिला यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन स्त्री शक्तीचे प्रदर्शन केले.हे सामने भरवण्याच्या पाठीमागे मुलींच्या मनात या खेळाची आवड निर्माण झाली पाहिजे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.या सामन्यात ६ संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत अंतिम सामना पापा की परी विरोधात लगान या दोन संघात झाला. या अटीतटीच्या सामन्यात पापा की परी ने लगान या संघाचा पराभव करून अंतिम सामना आपल्या खिशात घातला.विजेता संघाला रोख रक्कम आणि ट्रॉफी पारितोषिक देण्यात आले.उपविजेत्या संघाला सुद्धा काही रोख रक्कम आणि ट्रॉफी पारितोषिक देण्यात आले.सर्व संघांना ट्रॉफी आणि खेळाडूंना मानचिन्ह पदक (मेडल) देण्यात आले. ही संपूर्ण स्पर्धा यशस्वी होण्यासाठी वाल्मिकी समाजाचे मुरारी वाल्मिकी, प्रेमपाल वाल्मिकी, राजेंद्र गुदरिया, सुनील पारचा, सूरज वाल्मिकी, बंटी वाल्मीकि, समील पारचा, सुरेश शर्मा, पप्पू वाल्मिकी इत्यादी मित्र परिवार यांनी मेहनत घेऊन यशस्वी रित्या स्पर्धा पार पाडली. स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाल्याने वाल्मिकी समाजाच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.जागृती पारचा यांनी आपल्या मनोगतातून महिला वर्गांना प्रथमच क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्याची संधी दिली. महिलांना प्रोत्साहन दिले असे सांगत आयोजकांचे आभार मानले. सदर स्पर्धेला रसिक प्रेषक, जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला असल्याचे अध्यक्ष बंटी वाल्मीकि यांनी सांगितले.

पाल्य व पालकांना सुविधांअभावी वेठीस धरणाऱ्या केंद्र चालकांना वठणीवर आणणे आवश्यक ! जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे अन्यथा मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करण्याचा इशारा !

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : परभणीसह राज्यात सर्वत्र एमएचसीईटी प्रवेश परीक्षा सुरू झाल्या असून त्या परिक्षार्थीसाठी आवश्यक अशा पिण्याच्या पाण्याची वानवा, उष्माघाताने वक्ररुप धारण केले असताना विद्यार्थ्यांना मात्र शेडअभावी रखरखत्या उन्हातही रांगेत उभे करुन बायोमेट्रिक पध्दतीने सक्तीचा प्रवेश, परिणामी विद्यार्थी व पाल्यांना कमालीचा त्रास सोसावा लागत आहे. त्याशिवाय पाल्यांच्या सोबत आलेल्या पालकांसाठीही निवारा किंवा शेडची उपलब्धता नसल्याने जीवावर बेतणारा प्रसंग. खुल्या वर्गातील परिक्षार्थ्यांकडून प्रत्येकी ८०० रुपये फी वसूल केली जातेय. तरीही हजारोंच्या संख्येतील विद्यार्थ्यांकडून फीसच्या नावाने लाखो रुपये उकळणारे प्रशासन आणि केंद्र संचालक या दोघांनीही जाणीवपूर्वक या समस्यांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. ४० सेल्सिअस पाऱ्यातील तापमानाने परभणी शहर व परिसरारावर रौद्र रुप धारण केले आहे. अशा कडक उन्हाळा असलेल्या परभणी शहर व परिसरात तीन केंद्र देण्यात आली असल्याची माहिती पुढे आली आहे. परभणी मधील ब्राह्मण गाव रोडवरील मामू कॉफी सेंटर जवळ शांतिनिकेतन इन्स्टिट्यूट नावाचे एक केंद्र देण्यात आले आहे.

या परीक्षा केंद्रावर रखरखत्या उन्हात रांग लावून बायोमेट्रिक पध्दतीने प्रवेश सक्तीचा करण्यात आला आहे. खेदाची बाब म्हणजे या केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय करण्यात आलेली नाहीये. जिल्ह्याभरातील विविध गावखेड्यांतून परीक्षेला बसलेल्या पाल्यांसोबत आलेल्या शेकडो पालकांनाही उन्हापासून बचाव करण्यासाठी व पिण्याच्या पाण्याची कोणतीही सुविधा केली नाही तसेच त्यांना सावलीचा निवारा म्हणून थांबण्यास शेड अथवा ट्रेंट अशी कुठलीही सोय करण्यात आलेली नाही.

जिल्हा प्रशासनाने या अत्यंत आवश्यक अशा परिस्थितीकडे तातडीने लक्ष घालणे गरजेचे आहे. शासन तथा परिक्षा केंद्र व्यवस्थापनाने या गंभीर प्रश्नाची दखल घेणे व तशी सोय उपलब्ध करणे अपेक्षित होते. तथापि गेंड्याची कातडी परिधान केलेली प्रशासकीय यंत्रणा पाल्य आणि पालकांना जाणीवपूर्वक वेठीस धरीत असल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून अशा प्रकारची उणीव तात्काळ दूर करण्यासाठी संबंधितांना सक्तीचे आदेश द्यावेत. अन्यथा त्यांनी याप्रकरणी जाणीवपूर्वक हेळसांड केली असे समजून त्यांच्या व संबंधित प्रशासनाच्या विरोधात मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करुन न्याय मागितला जाईल, असा इशारा ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय कराळे यांनी दिला आहे. शासन किंवा प्रशासन अशा प्रकारच्या मुलभूत सुविधा पुरविण्यास असमर्थ ठरत असेल तर त्यांनी भविष्यात अशी केंद्र निर्मिती करुच नये, ज्यामुळे रखरखत्या उन्हातही हजारो पाल्य व पालकांना पाण्यावाचून तडफडावे लागणार नाही. दरम्यान. मुळातच जिल्ह्यात ४० सेल्सिअस उष्माघाताचा पारा, त्यात कपडे ओलेचिंब होऊन घामाघूम झाल्याने शरिराला आवश्यक असणाऱ्या पाण्याचा अभाव, त्यातच पाण्यावाचून कोणावर जीवघेणा प्रसंग उद्भवला व त्यांचे काही बरेवाईट झाले तर त्याला जबाबदार कोण राहणार, हा खरा चिंतेचा सवाल आहे. एका बाजूला अभ्यास व परिक्षेची चिंता तर दुसरीकडे जीवनास आवश्यक अशा गरजांची उणीव परिणामी हेळसांड या दुहेरी चक्रव्युहात सापडलेल्यांना खऱ्या उपलब्धतेची व आश्रयाची गरज असताना परभणीतील प्रशासकीय यंत्रणा मात्र जाणीवपूर्वक हेळसांड करीत आहे. यापेक्षा दुर्दैव ते कोणतं म्हणायचं वातानुकूलित कार्यालयात बसून दिवसाकाठी थंड पाण्याच्या कित्येक बाटल्या रिचवणाऱ्या आणि आदेशाचे चिठोरे काढणाऱ्या मस्तवाल अधिकाऱ्यांना रखरखत्या उन्हाचा व प्यायला पाणीच नसल्यावर काय परिस्थिती उद्भवली जाते, याची किंमत ती काय कळणार हा सवाल आहे. मानवता आणि मानवधर्माची खरी चाड असेल तर कोणताही अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करणार नाही परंतु जे कुठेही त्रासदायक केलं जातं नाही, ते मात्र परभणीत घडलं जातेय, नव्हे येथे ते घडवलं जातेय, हे सांगितले गेले तर ते मुळीच चुकीचे ठरणार नाही.

खांडेगावच्या ग्रामसेवक, सरपंचांनी केलेल्या कामाच्या चौकशीसाठी पाच दिवसापासून उपोषण



हिंगोली ■ रुपेश एंगडे

हिंगोली : वसमतच्या पंचायत समितीच्या कार्यालयापुढे खांडेगाव येथे केलेल्या १४ वा वित्त आयोग व १५ वा वित्त आयोग निधीमधून केलेल्या विविध कामांमध्ये भष्ट्राचार झाला आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजना मध्ये गरिब लोकांना वंचीत ठेवून धनदांडग्याना लाभ दिला आहे. अशा अशयाचे निवेदन चौकशी करण्यासाठी विनोद बापुराव सोनटक्के यांनी उपोषणाला बसण्या आगोदर २२ दिवसापुर्वीच हे निवेदन गटविकास अधिकारी यांना दिले होते. त्यावर गटविकास अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली नाही आणी आज पाच दिवसापासुन तक्रारदार उपोषण करत आहे. त्याकडे आजही प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. या भ्रष्टाचाराची जडे गटविकास अधिकारी यांच्यापर्यंत असण्याची शक्यता आहे. म्हणूनच चौकशीला उशीर होत असल्याचे जनतेमध्ये चर्चा ऐकायला मिळत आहे.

पालकमंत्र्यांनी घेतला सेवाग्राम विकास आराखड्याचा आढावा; आराखड्यातील कामांना गती देण्याच्या सूचना

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : सेवाग्राम परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मंजूर केलेल्या सेवाग्राम विकास आराखड्यातील कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना राज्यमंत्री गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण व सहकार तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केल्या. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हाधिकारी वान्मथी सी., उपवनसंरक्षक हरविर सिंग, कार्यकारी अभियंता सतीश अंभोरे, मे. अडारकर असोसिएशनचे प्रतिनिधी, आश्रमाचे सचिव विजय तांबे, जे.जे. स्कुलचे अधिव्याख्याता डॉ. विजय सकपाळ, वसीम खान व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सेवाग्राम विकास आराखडा अंतर्गत पहिला टप्पा १४५ कोटी, दुसरा टप्पा १७.५१ कोटी व तिसरा टप्पा ८१.५७ कोटी अशा २४४.०८ कोटी किमतीच्या आराखड्यास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली प्रदान केली आहे. यात १३९ कामांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी ९५ कामे पूर्ण झाली आहेत. यात 'राष्ट्रपिता महात्मा गांधी, एक अनुभूती' या विशेष कार्यक्रमाचा समावेश आहे. तीनही टप्प्यातील कामांचा आढावा पालकमंत्री डॉ. भोयर यांनी घेतला. पवनार ग्रामपंचायत भवन बांधकाम तातडीने पूर्ण करावे व दोन महिन्यात ग्रामपंचायत भवन हस्तांतरित करावे, असेही त्यांनी सांगितले. आराखड्यातील कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

कोषागार कार्यलयासमोरील जागेत असलेल्या हॉकर्स प्लाझाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेचे सुशोभीकरण करण्यात यावे असे ते म्हणाले. आराखड्यातील प्रस्तावित असलेली कामे सोलरवर प्रस्तावित करावी, जेणेकरून वीज बचत होऊन विद्युत देयक शुन्य होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. आराखड्यातील कामे गतीने पूर्ण करतांनाच ती गुणवत्तापूर्ण होतील याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात यावे, असे पालकमंत्री म्हणाले.

सेवाग्राम विकास आराखड्यातील कामे संथगतीने होत असून विकास कामांना गती देण्यात यावी असे पालकमंत्री म्हणाले. सेवाग्राम आश्रम येथे तयार करण्यात येणाऱ्या आर्ट गॅलरीत असणाऱ्या साहित्य सामग्री बाबत सादरीकरण करण्यात यावे, असे त्यांनी सांगितले. वर्धा शहरातील झांशी राणी चौकातील पुतळा लहान असून तिथल्या भव्य पुतळ्याचे डिझाइन तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी 'राष्ट्रपिता महात्मा गांधी, एक अनुभूती' अंतर्गत मंजूर कामाचा व कार्यान्वित यंत्रणाचाही आढावा घेण्यात आला.

सावनेर तालुक्यातील मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळेत मूकबधिर निवासी सावनेर शाळेचा प्रथम क्रमांकासाठी निवड

नागपूर ■ दिलीप येवले

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियान अंतर्गत तपासणी; सावनेर तर्फे नगरपरिषद हायस्कूल कळमेश्वर येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



नागपूर : शनिवारी शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्यावतीने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियान अंतर्गत शनिवारला १९ एप्रिल रोजी तपासणी करण्यात आली. त्यामध्ये मूक बधिर निवासी सावनेर या शाळेची सावनेर तालुक्या मधून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा यामध्ये प्रथम क्रमांक करीता निवड झाली. शिक्षण विभाग पंचायत समिती सावनेर तर्फे नगरपरिषद हायस्कूल कळमेश्वर येथे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. आमदार आशिष देशमुख यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व तीन लक्ष रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा महाशब्दे यांनी स्विकारला. यावेळी संस्थेचे सचिव नानाभाऊ समर्थ, संस्थेचे कोषाध्यक्ष निखिल समर्थ, संस्थेचे सहसचिव डॉ. अमित चेडे, शाळेच्या वाचातज्ञ दुर्गा चेडे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी इत्यादींच्या उपस्थितीत स्विकारण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. आम्ही ठाकर ठाकर नृत्य सादर केले. सर्वांनी विद्यार्थ्यांचे खूप खूप कौतुक केले. यावेळी पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे संचालक मंडळ व शिक्षक कर्मचारी व सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात आले.

परवाना मेमोरियल ट्रस्ट तर्फे क्रीम्स- किंग्सवे हॉस्पिटलला रुग्णवाहिका दान

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनचे संस्थापक एच.एल. परवाना यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमिताने किंग्जवे येथील परवाना भवन येथे एका समारंभात परवाना मेमोरियल ट्रस्टने अत्याधुनिक रुग्णवाहिकेचे उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला, परवाना ट्रस्टचे विश्वस्त डी.एस.बुचे, सुरेश बोभाटे आणि रामकुमार गुप्ता यांनी स्वागत केले. परवानाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यावेळी विश्वस्त मोहन शर्मा, बी एन जे शर्मा, जयवंत गुरवे, राम नेरकर आणि डॉ. युगल रायलू उपस्थित होते. यानंतर बी एन जे शर्मा यांनी सांगितले की, कॉ. परवाना यांच्या स्मृति प्रीत्यर्थ, ट्रस्टकडून क्रिम्स-किंग्सवे हॉस्पिटल ला एक अत्याधुनिक रुग्णवाहिका दान करण्यात येत आहे. ट्रस्ट च्यावतीने, वरिष्ठ विश्वस्त मोहन शर्मा यांनी क्रीम्स किंग्सवे हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. तुषार गावड यांना रुग्णवाहिकेच्या चाव्या सुपूर्द केल्या. रुग्णवाहिका हस्तांतरणानंतर कॉ. तारकेश्वर चक्रवर्ती मेमोरियल ऑडिटोरियम मध्ये परवाना स्मृती व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मोहन शर्मा यांनी भूषवले. व्यवस्थापकीय विश्वस्त डी.एस.बुचे यांनी प्रास्ताविक केले आणि सांगितले की, ट्रस्ट नेहमीच सार्वजनिक कल्याणासाठी कार्यक्रम आयोजित करत आला आहे. त्यांनी प्रमुख पाहुणे आणि वक्ते सुरेश बोभाटे यांची ओळख करून दिली. सुरेश बोभाटे यांनी आपल्या भाषणात कॉ. परवाना यांच्या संपूर्ण जिवनांवर प्रकाश टाकताना ते म्हणाले की कॉ. परवानासारख्या लोकांच्या त्याग आणि संघर्षा मुळेच आज बँक कर्मचाऱ्यांना ज्या सुविधा आणि सुरक्षा मिळत आहे ती मिळत आहे. संघर्षातूनच विजय मिळतो हे सत्य नवीन पिढीला कळले पाहिजे. अध्यक्षीय भाषणात, मोहन शर्मा यांनी तरुण पिढीला त्यांच्या संबंधित संघटनांचा इतिहास जाणून घेण्याचे आवाहन केले कारण आज पुन्हा एकदा सर्व क्षेत्रातील कामगारांसमोर नवीन आवाहने उभी राहिली आहेत. आपल्या एकता आणि संघर्षातूनच या परिस्थितींना तोंड देणे शक्य आहे, असे ते म्हणाले. रामकुमार गुप्ता यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कॉम. जयवंत गुरवे आणि त्यांच्या टीम ने अथक परिश्रम घेतले.

सेलु तालुक्यातील वानरविहीरा येथील पिडीतेच्या घरी खासदार अमर काळे यांनी दिली भेट

सेलू ■ प्रशांत झाडे

सेलू तालुक्यातील हिंगणी लगतच्या वानरविहीरा येथे शुक्रवारी रात्री २.०० वाजता १२ तरुणांनी तलवार, चाकू, लोखंडी रॉडसह एका घरी हल्ला केला व त्यात घरातील मुलीचे आई-वडीलांना मारहाण करुन मुलीला जबरदस्तीने पळवून नेल्याची घटना घडली. यात मुलीचे आई-वडील गंभीर जखमी झाले असून या घटनेने संपुर्ण गावात दहशत पसरली असून संपूर्ण गाव सध्या दहशतीत जिवन जगत असल्याचे जाणवले.

सदर प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन खासदार श्री अमर काळे यांनी पिडीतेच्या घरी भेट दिली. खासदार अमर काळे यांनी आपल्या भेटीत संपूर्ण गावकऱ्यांशी चर्चा केली पिडीतेच्या आई-वडीलांची भेट घेऊन संपूर्ण घटनेची माहिती घेतली व परिवाराचे सांत्वन करुन गावकऱ्यांना धिर दिला. त्यांनी इतकेच नाही तर पिडीत मुलीची सुध्दा भेट घेतली.

खासदार अमर काळे यांनी पोलीस अधिक्षक यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा करुन प्रकरणाचे गांभिर्य त्यांचे लक्षात आणून दिले व प्रत्यक्ष घटना स्थळी भेट देऊन सर्व परिस्थिती समजावून घेऊन हया प्रकरणाची दखल घेऊन आरोपी विरुध्द तात्काळ कडक कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्यात, पोलीस अधिक्षकांनी सुध्दा खासदार महोदयांचे निर्देशानुसार वानरविहीरा गावाला व पिडीतेच्या घरी भेट देण्याचे मान्य करुन प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेऊन तात्काळ संपूर्ण आरोपींना पकडून कडक कार्यवाही करण्यात येईल असे खासदार श्री अमर काळे यांना सांगितले.

राळेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जंयती उत्साहात; आंबेडकर विचार मंचच्या वतिने केले भोजन दानाचे आयोजन

गौळ ■ योगेश कांबळे



गौळ : आंबेडकर विचार मंच राळेगाव जिल्हा यवतमाळ च्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. या निमित्त भोजन दान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्ण कृती पुतळ्याला हारार्पण करून मान वंदना देण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर विचार मंच चे अध्यक्ष डॉ. विठ्ठल लढे यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या १३४ व्या जयंती निमित्त केक कापण्यात आला. व पंचशील आणि त्रिशरण ग्रहण करण्यात आले.उपस्थिताना पुरी आणि भाजी चे भोजन दान विचार मंच चे अध्यक्ष डॉ. विठ्ठल लढे यांच्या हस्ते करण्याय आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती राळेगाव चे उपाध्यक्ष अरविंद वाढोणकर ,संचालक अंकुश मुनेश्वर, संचालक राजेंद्र तेलंगे संचालक ,गोवर्धन वाघमारे, किशोर धामंदे ,प्रकाश पोपट, शयाम येणोरकर,बाळू दरने नगर सेवक मंगेश राऊत नगर सेवक दिलीप दुधगीकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच चे शिलेदार बाबा नगराळे, इंद्रजीत लभाने ,प्रवीण धुपे, प्रमोद काळे, विनायक नगराळे, देवेंद्र मून नितीन कांबळे उपस्थित होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्या वतीने दरवर्षी संविधान अमल बजावणी दिवस उत्सवाने संविधान दिवस म्हणून भीमगीताने साजरा करण्यात येते हे विशेष उल्लेखनीय आहे .या जंयतीदिनी पंचशील झेंडा एक समाज मोहीम राबविण्यात आली .कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विचार मंच चे युवा अध्यक्ष अक्षय नगराळे ,अक्षय ढाले, योगेश मलोंडे हिमत गायकवाड, सुदान कुंड, विनायक गोटे, गुरुदास नगराळे, केतन लढे ,शिवशंकर मडावी, जगन नगराळे ,राहुल उमरे, नितीन दसोडे, नीलेश वनकर, यांनी परिश्रम घेतले.

तहसीलदार कारंजा यांच्या मार्फत बेलगावात विविध दाखल्यांचे वितरण

कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर



कारंजा : एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प, वर्धा व तहसिल कार्यालय, कारंजा घा. यांच्या संयुक्त विद्यमाने १०० दिवस कृतीआराखडा कार्यक्रमाअंतर्गत मा. श्रीमती ऐश्वर्या गिरी तहसिलदार कारंजा घा. यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१/०५/२०२५ रोजी ग्रामपंचायत बेलगाव येथे शिबीर आयोजित करण्यात आले.

शिबिरामध्ये श्री.एस.एम. टिपरे ना. तहसिलदार कारंजा यांनी महसूल विभागाच्या विविध योजनांची माहिती देऊन शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यात यावा असे आवाहन करण्यात आले याप्रसंगी उत्पन्नाचे दाखले, राशन कार्ड, जातीचा दाखला अधिवास प्रमाणपत्र वाटण्यात आले.यावेळेस कृषी विभाग, आरोग्य विभाग यांनी आपल्या विविध योजनांची माहिती ग्रामस्थांनाना दिली.

शिबिरीकारिता श्री. स्वप्नील खवशी (सरपंच), श्री. मनोज सिरसाम उपसरपंच, श्री. किशोर भांडोपिया मंडळ अधिकारी कारंजा. श्री. नवखरे तलाठी तसेच श्री. रमेश सावरकर ग्रामसेवक, श्रीमती गोदावरी आत्राम पोलीस पाटील, श्री. पारवे आरोग्य सेवक, श्रीमती लता आत्राम अंगणवाडी सेविका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तुमसर पोलीसांकडून अवैध रेती वाहतूक प्रकरणी कठोर कारवाई; ४० लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

भंडारा ■ प्रतिनिधी



तुमसर - तुमसर पोलीस स्टेशन अंतर्गत शासनाच्या मालमत्तेची चोरी आणि अवैध रेती वाहतूक प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. यात चार वेगवेगळ्या प्रकरणांत एकूण ?४०,६०,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरुद्ध विविध कायद्यांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या प्रकरणात, अर्जुन पप्पु जाधव (वय ४४), काशिफ खान (वय २८) आणि ठाकचंद आत्माराम (वय ४०) यांनी ट्रक क्रमांक श्ट-४९०श-८८८२ वापरून ६.५० ब्रास रेती (किंमत ?३९,०००) विनापास बेकायदेशीर वाहतूक केली. या घटनेवर फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ (८) व पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ७.१५, तसेच इतर लागू कलमांतर्गत गुन्हा क्रमांक २२२/२०२५ नोंदवण्यात आला.

दुसऱ्या प्रकरणात, शेख मेहमुद (वय ३७), ईद्रीस अन्सारी (वय ५०) आणि ठाकचंद आत्माराम यांनी ट्रक क्रमांक श्ट-४९०इ-७४७४ मध्ये ६ ब्रास रेती (किंमत ?३६,०००) चोरटी वाहतूक केली. फिर्यादीच्या लेखी तक्रारीनुसार, कलम ३०३(२), ४९, ३(५) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा क्रमांक २२३/२०२५ नोंदवण्यात आला.

तिसऱ्या प्रकरणात, किरण सतिकोसरे (वय ४२), अजीज मुस्तफा (वय ४५) आणि ठाकचंद आत्माराम यांनी ट्रक क्रमांक श्ट-४९-२५७७ वापरून ६.५० ब्रास रेती (किंमत ?३९,०००) बेकायदेशीरपणे वाहतूक केली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून, कलम ३०३(२), ४९, ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा क्रमांक २२४/२०२५ नोंद करण्यात आला.

चौथ्या प्रकरणात, करीम रजाक (वय ३५), ट्रक मालक आणि ठाकचंद आत्माराम यांनी ट्रक क्रमांक श्ट-४०ण्ऊ-७३९१ मध्ये ६ ब्रास रेती (किंमत ?३६,०००) विनापास वाहतूक केली. फिर्यादीच्या लेखी तक्रारीवरून गुन्हा क्रमांक २२५/२०२५ नोंद झाला असून संबंधित कलमांखाली कारवाई झाली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नूरुल हसन, अपर पोलीस अधिक्षक ईश्वर कातकडे, पोलीस उपअधीक्षक कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आकाशकुमार एस. साखर, यांनी केली असुन अधीक तपास पोलीस स्टेशन कारधा चे अधिकारी करीत आहे .

गरमसूरचा पुनर्वसनचा विषय मार्गी, गावकऱ्यांनी केला पालकमंत्र्यांचा सत्कार : जंगलव्याप्त गरमसूरचे पुनर्वसन होणार

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : जंगलाने घेरलेले गांव, सतत वन्यप्राण्यांचा संचार अशा कठीण परिस्थितीत जगत असलेल्या गरमसूर व अन्य चार गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निकाली निघाला आहे. गरमसूर गावाचा पुनर्वसन विषय निकाली काढल्याबद्दल येथील नागरिकांनी सोमवारी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा सत्कार करीत आभार मानले. याप्रसंगी माजी खा. रामदासजी तडस, अशोक कलोडे, सरपंच अर्चना राऊत, वर्धा नपचे माजी उपाध्यक्ष प्रदीप सिंग ठाकूर आदी उपस्थित होते.

वर्धा- नागपूर जिल्ह्याच्या सिमेवर असलेला बोर टायगर रिजर्व देशातील एक छोटा टायगर रिजर्व असून मागील काही वर्षांत आरक्षित वनामध्ये वन्यप्राण्यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे रिजर्व क्षेत्र देखील वाढविण्यात आले. परंतु टायगर रिजर्वच्या क्षेत्रात असलेल्या गावांचा पुनर्वसनाचा विषय निर्माण झाला होता. या क्षेत्रात काहीं गावे येत असल्याने या गावांचे पुनर्वसन करण्याची मागणी जोर धरत होती. अशातच डॉ. पंकज भोयर यांनी रिजर्व क्षेत्रातील नवरगांवचे पुनर्वसन केल्याने गरमसूरसह येनीदोडका, मेट हिरजी, उमरविहिरी, मरकसूर या गावांनी देखील पुनर्वसनाची मागणी रेटून धरली. गरमसूर येथील नागरिकांनी पुनर्वसन समिती स्थापन करून आपली मागणी रेटून धरली होती. डॉ. पंकज भोयर यांनी गरमसूर गावाच्या पुनर्वसनाचा विषय शासन दरबारी लावून धरला होता. चहूबाजूने ही गांवे जंगलाने वेढली असल्याने सतत होणारे वन्यप्राण्यांचे हल्ले, जीव मुठित घेऊन येथील नागरिक सतत वावरत असल्याने या गावांचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली. नुकतीच राज्य वन्यजीव मंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत गरमसूरसह अन्य चार गावांचे पुनर्वसनास मान्यता देण्यात आली. गावाच्या पुनर्वसनाचा विषय मार्गी लावल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोर व्याघ्र प्रकल्प बाधित पुनर्वसन संघर्ष समितीचे अध्यक्ष दिलीप सलामे, उपाध्यक्ष सुरेश शेंडे, सचिव गजानन डोंगरे, सहसचिव सुरेश वरठी, सरपंच अर्चना राऊत, जगन डोंगरे, वामनराव कौरती, सौ. लक्ष्मीताई चोपडे, सौ. हिरा धंडाळे, रामकृष्ण कातलाम, ज्ञानेश्वर वरखडे, सूर्यवंता मेश्राम, प्रभाकर उईके, मनोहर इवनाथे, उमेश सलाम व नागरिक उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले की, गरमसूर गावाचे पुनर्वसन करण्याचा मी शब्द दिला होता. तो आज पूर्ण झाला आहे. नवरगांव प्रमाणेच गरमसूर गावाचे देखील चांगल्या पद्धतीने पुनर्वसन करण्यात येईल, असे ही ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वनमंत्री नाईक यांच्या सहकार्यामुळे हा प्रश्न निकाला निघाल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी बोलताना रामदास तडस म्हणाले की, गरमसूर वासियांची मागणी १० वर्षांनी पूर्ण झाली आहे. पुनर्वसनाचा विषय मार्गी लागण्यासाठी अनेक वर्ष वाट पाहवी लागते. याचे उदाहरण अनेक आहेत. मात्र आपल्या गावाचे पुनर्वसन लवकर मंजूर झाले आहे. पालकमंत्री पंकज भोयर यांच्या कार्यतत्परतेमुळे हा विषय मार्गी लागला आहे. मंत्री झाले की कामाचा प्रचंड व्याप असतो. त्यामुळे मतदार संघाला पुरेसा वेळ मंत्री देऊ शकत नाही. मात्र पालकमंत्री याला अपवाद ठरले आहे.

शब्द पाळणारे आमदार डॉ. भोयर

गरमसूर गावातील नागरिक जीव मुठीत घेऊन जगत होती. मागील अनेक वर्षांपासून त्यांचा संघर्ष सुरू होता. डॉ. पंकज भोयर यांनी गावाचे पुनर्वसन करण्यात येईल, असे वचन दिले होते. या वचनाची पूर्तता त्यांनी आज केली आहे. दिलेला शब्द पाळणारे ते आमदार आहेत.

सौ. शोभा चोपडे- पुनर्वसन संघर्ष समिती सदस्य

गावाचा जटिल प्रश्न सुटला

गरमसूर गांव जंगलव्याप्त दुर्गम भागात होते. गावातील व्यक्ति अथवा सदस्य शेतात अथवा बाहेर गेला की तो परत येणार की नाही याची शाश्वती नव्हती. त्यामुळे पुनर्वसनाची मागणी करण्यात आली होती. डॉ भोयर यांनी शासन दरबारी आमच्या मागणीसाठी सतत पाठपुरावा केला.त्यामुळे हा कठीण प्रश्न निकाली निघाला आहे.

अर्चना राऊत-सरपंच/ सुरेश शेंडे- उपसरपंच

आदिवासी विकास विभागाच्या नवीन इमारतीची पालकमंत्र्यांनी केली पाहणी



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : जिल्हा न्यायालयामागे ५ कोटी ४१ लक्ष २१ हजार ७३४ रुपये खर्च करुन बांधन्यात आलेल्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयच्या नवीन ईमारतीची आज राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पाहणी केली.

यावेळी आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ, उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे, मुख्याधिकारी विजय देशमुख, आदिवासी विकास विभागाच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुक्तलवार, आदी उपस्थित होते.

अत्याधुनिक सोइसुविधांनीयुक्त सुसज्ज अशी पाच मजली असलेली आदिवासी विकास विभाग प्रकल्प कार्यालयाची नवीन ईमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून केवळ लिप्टचे काम व परिसरातील सौदर्यीकरणाची कामे बाकी आहेत. ९५ टक्के काम पूर्ण झालेल्या बांधकामाची पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज पाहणी करुन आदिवासी विकास विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना उर्वरीत कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सुचना केल्यात. बांधकामाचा दर्जा सुधारण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.

भविष्यातील गरजा लक्षात घेऊन अद्ययावतीकरणावर भर आवश्यक : विधानपरिषद सभापती राम शिंदे

विधानभवनातील प्रस्तावित कामांचा घेतला आढावा; सर्वसमावेशक नियोजनावर भर देण्याचे निर्देश

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूरः विधानभवनाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेता यात काळानुरूप अद्ययावतीकरण करणे आवश्यक आहे. यात पर्यावरण पुरक सुविधा, सर्वसमावेशक नियोजन यावर भर देत सर्व कामांची कालमर्यादेत कार्यवाही करण्याचे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले.

विधानभवन नागपूर येथील प्रस्तावित कामे व सद्यस्थितीत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी आज विधानभवनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला विधानसभा सभापती ?ड. राहुल नार्वेकर दूरदृश्यप्रणालीद्वारे तर विधिमंडळाचे सचिव -१ जितेंद्र भोळे, सचिव-३ विलास आठवले, सहसचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी ऋतुराज कुडतरकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे, मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांच्यासह संबंधित कार्यान्वयन यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते.

नागपुरातील आमदार निवास येथे व्यापक बदल आवश्यक आहेत. याचा अनेक काळापासून विस्तार झालेला नाही. येथील पूर्ण एफएसआय वापरून आमदार निवासाचा विस्तार करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

आमदार निवास आणि विधानभवन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येतात. प्रशासकीय कामात सुसूत्रता यावी यासाठी ही ठिकाणे विधिमंडळाच्या अखत्यारित असण्याची गरज आहे. यासाठीची तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश सभापती श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.

सिव्हिल लाईन्स परिसरातील १६० खोल्याचे बांधकाम अनेक वर्षांपूर्वी झाले आहे. या ठिकाणी पूर्ण एफएसआय वापरून बांधकाम करण्याचे नियोजन आहे. हिवाळी अधिवेशनासाठी येणारे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या गरजा लक्षात घेता निवासव्यवस्थेत सुसूत्रता येण्याची गरज आहे. विधिमंडळाची इमारत वर्षभर सुस्थितीत राहावी यासाठी देखभाल दुरुस्तीचा सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

हिवाळी अधिवेशनासाठी प्रशासकीय व विधिमंडळ कामकाजाच्या दृष्टीने सन्माननीय मंत्री तसेच राज्यमंत्री यांच्यासाठी कार्यालयीन दालनाची गरज लक्षात घेतली पाहिजे. यात आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत सुलभता असणे आवश्यक आहे. हे सर्व काम येत्या अधिवेशनापूर्वी कसे होतील यावर आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली. आवश्यकतेप्रमाणे तात्पुरती दालने व व्यवस्था करण्यात यावी असे विधानसभा अध्यक्ष ?ड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

बैठकीपूर्वी विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी आज शासकीय मुद्रणालय, १६० गाळे, आमदार निवास, विधानभवन परिसराची पाहणी केली.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, वर्धा ची कामगीरी; बस स्टॉप वर्धा तसेच ॲटो रिक्षा मध्ये बसून प्रवाशांचे पर्स/पॉकेट/पैशाची चोरी करणारी महिलांची टोळी जेलबंद

वर्धा ■ प्रतिनिधी



मागील काही दिवसांपासून बस स्टॉप वर्धा येथे चोरीचे प्रमाण वाढले होते, तिथे जिल्ह्यातील तसेच बाहेरील जिल्ह्यातील महिला तोंड बांधून बस मध्ये प्रवासी चढत असताना प्रवाशांचे पॉकेट मारणे, हातातील बॅगमधून पैसे काढणे अशा प्रकारच्या घटना वाढल्या होत्या त्यानूसार बस स्टॉप वर्धा येथे गुप्त बातमीदारा द्वारे ट्रॅप लावून चोरी करताना रंगेहात पकडल्या आहेत तसेच त्यांनी मागील काही दिवसांपासून पोस्टे वर्धा शहर हद्दीत विविध गुन्हयात बस स्टॉप परिसर वर्धा, ॲटो रिक्षा मध्ये बसून प्रवांशाचे पैशांची चो-या केल्याची कबुली दिली त्यानूसार पोस्टे वर्धा शहर येथील १)अप क ६२७/२५ कलम ३०३ (२) बीएनएस २) अप क २८६/२५ कलम ३०३ (२) बीएनएस ३) अप क ३८२/२५ कलम ३०३ (२)बीएनएस च्या गुन्हे उघड झाले असून आरोपींकडून ३०,०००/- रु नगदी रक्कम रिकव्हरी केली असून पूढील तपास सूरु आहे. आरोपी क ०१) सरिता उदयभान हातागळे, वय ३५ वर्ष, रा रामेश्वरी नगर, नागपूर, आरोपी क ०२) चांदणी सागर नाडे, वय २१ वर्ष, रा रामेश्वरी रिंग रोड, रामटेक नगर, नागपूर, आरोपी क ०३) श्रीमती कविता गौतम बनसोड, वय ४९ वर्ष, रा आनंदनगर, पुलफैल, वर्धा असे आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री अनुराग जैन साहेब, मा अपर पोलीस अधिक्षक श्री सागर कवडे साहेब, मा उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर साहेब तसेच पोलीस स्टेशन वर्धा शहर ठाणेदार मा पराग पोटे साहेब यांच्या मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरण पथक चे पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड, पोहवा प्रशांत वंजारी, पोहवा शैलेश चाफलेकर, पोहवा नरेंद्र. कांबळे, राजेश राठोड, विजय पंचटिके, पोशी श्रावण पवार, पोशी शिवाजी डोईफोडे सर्व पोलीस स्टेशन वर्धा शहर यांनी केली

'बोंडे नदिपात्रातून अवैधरित्या रेतीची वाहतूक; ट्रॅक्टरसह ५.०६ लाखांचा मुद्देमाल जप्त'



भंडारा ■ प्रतिनिधी

लाखनी -यामधील फिर्यादी हे स्टाफसह पेट्रोलिंग करत असताना, घटनास्थळावर आरोपीच्या ताब्यात असलेल्या EICHER 368 वाहनाची पाहणी केली असता.

त्याचा ट्रॅक्टर क्र. MH36AG8393 किंमती अंदाजे ४,००,००० रू. व लाल रंगाची बिना नंबरची ट्राली कि. अंदाजे १,००,०००/- रू. मध्ये अंदाजे १ ब्रास रेती कि. ६५००/- रू. असा एकूण ५,०६,५००/- रु चा माल बोंडे नदिपात्रातून शासकिय रेतीची चोरी करून शासनाचा महसुल बडवुन पर्यावरणाचे नुकसान करून अवैद्रद्यरित्या वाहतुक करताना मिळुन आल्याने फिर्यादिचे लेखी रिपोर्ट व कागदपत्रा वरून पो.स्टे. लाखनी अप क्र-१३१/२०२५ कलम ३०३ (२) भान्यास २०२३ सहकलम ४८ (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ९ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ सहकलम ५० (१)/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई नूरुल हसन, पोलीस अधीक्षक भंडारा. ईश्वर कातकडे. अपर पोलीस अधीक्षक भंडारा यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक यादव पो. हवा. निलेश रामटेके यांनी केलेली आहे.

हिंदी विश्वविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर : जनसंपर्काची भूमिका विषयावर २२ व २३ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात महाराष्ट्र सरकारचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, विद्यालयाचा जनसंपर्क विभाग व जनसंपर्क कार्यालय तसेच पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया, वर्धा चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने २२ व २३ एप्रिल रोजी कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर : जनसंपर्काची भूमिका या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन मंगळवार, २२ एप्रिल रोजी गालिब सभागृहात सकाळी ११ वाजता कुलगुरू प्रोफेसर कुमुद शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येईल. याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून वर्धा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अनुराग जैन, विशिष्ट अतिथी म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूरचे संचालक डॉ. गणेश मुळे पीआरएसआय पश्चिमचे उपाध्यक्ष एस पी सिंह, नागपूर तसेच कुलसचिव प्रो. आनंद पाटील उपस्थित राहतील. यावेळी मानविकी व सामाजिक विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. फरहद मलिक स्वागत भाषण देतील तर जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे विषय प्रवर्तन करतील. चर्चासत्राचे संयोजक जनसंचार विभागाचे असोसिएट प्रोफेसर डॉ. राजेश लेहकपुरे असून सह संयोजक वर्धा जिल्हा माहिती अधिकारी रवि गीते व विश्वविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी बी.एस मिरगे असतील. चर्चासत्रात जनसंपर्क अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, माध्यम शिक्षक व विद्यार्थी सहभाग घेतील. या चर्चासत्रात मीडिया व जनसंपर्कात एआयची उपयोगिता, शिक्षणाच्या विकासात एआयची उपयोगिता, एआयचा प्रयोग : नैतिकता व संकट प्रबंधन, सायबर सुरक्षा आणि एआय या विषयांवर विचार विनिमय करण्यात येईल.

चर्चासत्राचा समारोप बुधवार, २३ एप्रिल रोजी दुपारी ४:४० वाजता कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली होईल. याप्रसंगी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूरचे संचालक डॉ. गणेश मुळे, सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी संजय इंगळे तिगावकर विशिष्ट अतिथी असतील तर जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे यांची विशिष्ट उपस्थिती राहील.

उद्घाटनानंतर मंगळवार, २२ एप्रिल रोजी मीडिया व जनसंपर्क यात एआयची उपयोगिता या विषयावर जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्रात माहिती व जनसंपर्क संचालनालय नागपूरचे संचालक डॉ. गणेश मुळे विशिष्ट वक्ता असतील तर आयआयआयटी नागपूरचे असोसिएट डिन तौसीफ दिवाण विषय तज्ज्ञ म्हणून संबोधित करतील. दुपारी तीन वाजता शिक्षणाच्या उत्खानात एआयची उपयोगिता या विषयावर हिंदी विविचे शिक्षण विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. गोपाल कृष्ण ठाकूर यांच्या अध्यक्षतेतील सत्र होईल. यावेळी आयआयआयटी नागपूरचे सहाय्यक प्रोफेसर डॉ. शिशुपाल कुमार, हिंदी विविचे लीला विभागाचे प्रभारी डॉ. अंजनी कुमार राय संबोधित करतील.

बुधवार, २३ एप्रिल रोजी तृतीय अकादमी सत्र अकरा वाजता एआयचा प्रयोग : नैतिकता व संकट प्रबंधन या विषयावर होईल. अध्यक्षस्थानी डॉ. गणेश मुळे राहतील. यावेळी आयआयआयटी नागपूरचे असोसिएटेड कौशिक दिवाण व डॉ. अंजनी कुमार राय संबोधित करतील. चतुर्थ प्राथमिक सत्र दुपारी तीन वाजता सायबर सुरक्षा व एआय या विषयावर होईल. सत्राच्या अध्यक्षस्थानी हिंदी विविचे विधी विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. जनार्दन कुमार तिवारी राहतील. याप्रसंगी डॉ. शिशुपाल कुमार व हिंदी विविचे मुख्य सूचना सुरक्षा अधिकारी डॉ. गिरीश चंद्र पांडे विचार मांडतील. या चर्चासत्रात उपस्थित राहण्याचे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर विश्वविद्यालयाचा जनसंपर्क विभाग व जनसंपर्क कार्यालय तसेच पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया वर्धा चॅप्टर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

लायन्स क्लब आयुर्वेद १८ पुरस्काराने सन्मानित

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : फॉर्च्यून रीगल बँक्वेट हॉल, सीताबर्डी, नागपूर येथे १७ एप्रील रोजी नुकत्याच झालेल्या रिजन कॉन्फरंस पारसंवेदमध्ये लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाला १८ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाच्या गेल्या २८ वर्षांच्या इतिहासात अध्यक्षा डॉ. मृणालिनी थटेरे यांच्या नेतृत्वाखाली सर्वाधिक पुरस्कार मिळाले आहेत. ज्यात सर्वोत्कृष्ट अध्यक्ष भाषण प्लॅटिनम पुरस्कार डॉ. मृणालिनी थटेरे, सुवर्ण पुरस्कार सचिव भाषण डॉ. प्रशांत गणोरकर, सर्वोत्कृष्ट सचिव प्रशांत गणोरकर, सर्वोत्कृष्ट कोषाध्यक्ष डॉ. अमिता खोब्रागडे, सर्वोत्कृष्ट फोटो डिस्प्ले सर्वोत्तम स्क्रॅप बुक, सर्वोत्कृष्ट बॅनर परेड, कमाल इक्विटी रिपोर्ट, सर्वोत्कृष्ट पी.एस.टी., सर्वोत्कृष्ट आर.सी.यांचा समावेश आहे. विजित, सर्वोत्कृष्ट स्थायी इक्विटी 'कफन' प्रदेशाचे ला. सतीश राणे, प्रदेशाचे समर्पित ला. डॉ. संजय थटेरे, वेशभूषा स्पर्धा ला. रीता जॉन, एलए.नीता मार्कम, ले. पुष्पा खंडेलवाल, कल्पना भोवरे इत्यादींना पुरस्कार मिळाले. रिजन कॉन्फरन्स प्रदेश अध्यक्षा डॉ.पार्वती राणे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सतीश राणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रांतिक राज्यपाल डॉ. रिपाल राणे, विनोद वर्मा, रघुजी राजे भोसले, डॉ. विनोद अडलखिया, टी.ए.होते. श्रावण कुमार, भरत बालगढ, विलास साखरे, विजय पालीवाल, राजेंद्र मिश्रा, चंद्रकांत सोनटक्के आदींनी लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदच्या अध्यक्षा डॉ.मृणालिनी थटेरे यांनी सर्व सदस्यांचे सक्रिय सहभागाबद्दल आभार व्यक्त केले. अशी माहिती लायन्स क्लब नागपूर आयुर्वेद चे डॉ. संजय थटेरे यांनी दिली.

वानरविहीरा येथील सशस्त्र हल्ला ; पोलीसांनी अवघ्या २४ तासात सात आरोपींच्या आवळल्या मुसक्या ;अल्पवयीन मुलीची केली सुटका ; गुन्हयातील वाहने घेतली ताब्यात

सेलू ■ प्रशांत झाडे



सेलू : तालुक्यातील हिंगणी लगतच्या वानरविहीरा येथील देशमुख यांचे घरावर शुक्रवारी रात्रीला बारा जणांनी सशस्त्र हल्ला करीत अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी यातील सात जणांना अवघ्या २४ तासाचे आत पकडण्यात यश मिळविले यात एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे त्यांचे तावडीतून मुलीची सुटका करण्यात आली पोलिसांनी या प्रकरणाचा छडा लावत मुलीची सुटका करीत सात जणांना ताब्यात घेतल्याने त्यांचे कार्याची प्रशंसा होत आहे

गुन्ह्याची हकीकत या प्रमाणे आहे की वानरविहीरा गावतील मारोती देशमुख हे शुक्रवारी दि. १९ रोजी रात्री आपले घरी परिवारासह झोपले असता मध्यरात्री २ वाजताचे सुमारास त्यांचे घराचा दरवाजा कोणीतरी जोरजोराने वाजविल्याच्या आवाजाने ते सर्व जागे झाले. तेवढ्यात अचानक त्यांचे घराचा लाकडी दरवाजा तोडुन वैभव थुल रा. सुकळी (स्टेशन) व त्याचे सोबत दहा ते बारा अनोळखी ईसम त्यांचे घरात घुसुन त्यापैकी वैभव थुल त्याचे हातामध्ये तलवार होती. एका ईसमाचे हातात लोखंडी सब्बल व बाकीचे जवळ लाठ्या काठ्या होत्या वैभव थुल सोडुन बाकी सर्वांनी त्याचे चेहरे कापडांनी झाकले होते. वैभव थुल याने त्याचे साथिदारांना उचला त्याचा मुलीला असे म्हटले असता. मारोती देशमुख यांनी त्यांचा विरोध केला असता वैभव थुल याने त्याचे हातातील तलवारीने मारोती देशमुख यांचे डावे हातावर व दंडावर मारले यात सौ. अरुणा मारोती देशमुख हिने सदर तलवार दोन्ही हातांनी पकडली त्यामुळे त्यांचे दोन्ही हातांचे पंज्याना मार लागला तेंव्हा वैभव थुल याचे सोबत आलेल्या एकाने मारोती देशमुख ला काडीने मारले बाकी ईसमांनी लाथाबुक्यांनी मारहान केली. ते पाहुन त्यांची पत्नी वाचविण्यास गेली असता. वैभव थुल याने तलवारीने तिला मारले तसेच फिर्यादीचे घरातील विटा उचलुन दोघानांही तोंडावर मारून जखमी केले. सदर घटना पाहुन अल्पवयीन मुलगी जोरजोराने ओरडली असता वैभव थुल याने तिचा हात पकडुन तिला जबरदस्तीने ओढत घरा बाहेर नेले, व जबरदस्तीने कार मध्ये टाकुन ते सर्व कार व दोन मोटार सायकलने नागपुर कडे जाणा-या रोडने पळुन गेले सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन जखमीना सेवाग्राम रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले याप्रकरणी पो. स्टे सेलू येथे जखमीच्या डी.डी. बयाण वरून कलम १०९, १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३३३, ११८(१), ११८(२), ८७, ३२४(३) भा. न्या. सं. सहकलम ४, २५ भा. ह. का. १९५९ अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला

. सेलू पोलीस स्टेशन येथिल गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपासाची चक्र फिरवत गुप्त बातमीदाराकडुन माहिती घेत अज्ञात आरोपीचे नाव निष्पन्न करून आरोपी क्र. १) वैभव प्रफुल थुल, वय १९ वर्ष, रा. सुकळी स्टेशन, ता. सेलू, जि. वर्धा, २) मंथन सुदर्शन डंभारे, वय १९ वर्ष, रा. जुवाडी, ता. सेलू ह. मु. वार्ड क्र. १६, सेलू, ३) अमन दत्तुजी मेश्राम, वय २० वर्ष, रा. रिमडोह, ता. हिंगणेघट, जि. वर्धा, ४) गणेश बंडुजी नारनवरे, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र. ४, मटन मार्केट, सेलू ५) आशीष भरत नेहारे, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, केळझर, ता. सेलू ६) नयन उद्धव बावणे वय २० वर्ष, रा. रिमडोह, ता. हिंगणघाट, जि. वर्धा यांना ताब्यात घेवुन अल्पवयीन मुलीची यातून सुटका करून अवघ्या २४ तासात सदर गुन्ह्याचा छडा लावत सहा आरोपीतांना अटक करून बेड्या ठोकल्या असुन गुन्ह्यात वापरलेल्या वाहने व ताब्यात घेतली.

सदर कार्यवाही पोलीस अधिक्षक अनुराग जैन , अपर पोलीस अधिक्षक सागर कवडे यांचे मार्गदर्शनात प्रमोद मकेश्वर उप विभागीय पोलीस अधिकारी वर्धा तसेच रोशन पंडीत उप. विभागीय पोलीस अधिकारी हिंगणघाट यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक मनोज गभने, सहाय्यक फौजदार. मनोहर मुडे, पोहवा अखिलेश गव्हाणे, सचिन वाटखेडे, शरद इंगोले, जावेद धामीया, गंगाधर तांबारे यांनी केली. तसेच सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रितम निमगडे व पोहवा विक्रम काळमेघ करत आहे.

उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल चव्हाण यांनी आदिवासी बहुउद्देशीय संस्थेला दिली भेट

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा जिल्ह्यातील देवळी तालुक्यात असलेल्या आगरगाव पारधी वस्ती येथील आदिवासी फासेपारधी बहुउद्देशीय संस्थेला. पुलगाव उपविभागीय अधिकारी मा.श्री राहुल चव्हाण व पारधी समाजातील थोर समाज सुधारक पुरस्कृत साहित्यिक नामदेव भोसले यांनी भेट दिली यामध्ये इतरही पारधी बेटांवर भेट देण्यात आली होती यावेळी आगरगाव बहादरपूर वायफळ या पारधी वेड्यावरील पारधी समाजाच्या समस्या जाणून घेतल्या ह्या अधिकारी माननीय श्री राहुल चव्हाण म्हणाले की पारधी समाजाने आपले जीवनमान स्वाभिमानाने आणि सन्मानाने जगावे पारधी समाजाने पारंपारिक व्यवसाय सोडून सन्मानाचा स्वाभिमानाचा व्यवसाय करावा शिक्षणाच्या प्रभात घ्यावं इतर समुदाय आज शिक्षण घेऊन खूप मोठ्या मोठ्या पदावर आहेत तसंच पारधी समुदायानेही सुशिक्षित होऊन आपले जीवनमान सुधारावर पारधी समुदायाने स्वच्छ राहायला पाहिजे निसर्ग स्वच्छ केला पाहिजे आपल्या घराचा अवतीभवतीचा परिसर हा नेहमी स्वच्छ ठेवायला पाहिजे कारण आजूबाजूचा परिसर जर आपण स्वच्छ ठेवला तर आपल्याला कुठले रोग होणार नाही ह्या सगळ्या गोष्टी पारधी समुदाय जेव्हा शिक्षणाच्या प्रवाहात येईल तेव्हा त्यांना सहज कळायला लागतील आतातरी पारधी समुदायाने शिक्षणापासून वंचित राहू नये पारधी समुदायाला घरकुल ओळखीचे पुरावे व अन्य योजनेत लाभ मिळावा यासाठी आम्ही सदैव पारधी समुदायाला मदत करू असे मत पुलगाव उपविभागीय अधिकारी माननीय श्री राहुल चव्हाण यांनी व्यक्त केले समाजासाठी अहोरात्र झटणारे रात्रीचा दिवस करणारे दऱ्याखोऱ्या डोंगरातील राहणार पारधी समुदाय कशा परिस्थितीत जगतो आहे त्यांना शासन प्रशासन वेळोवेळी सोय सुविधा पुरवत आहे का मात्र हे सगळं अजूनही दिसून येत नाही शासन अजूनही आदिवासी पारधी समुदायापर्यंत पोहोचू शकत नाही शासनाच्या योजना पारधी समुदायाच्या नावावर मात्र कागदावरच आहे वास्तव्यात अजूनही पारधी समुदाय हा प्रत्येक योजनेपासून वंचित आहे पारधी समुदाय हा कुठल्याही योजनेपासून वंचित राहू नाही व पारधी समुदायाला कुठलाही प्रकारचं अडीअडचण होऊन ये पार्टी समुदायाने शिक्षणाच्या प्रवाहात यावं पारधी समुदायाने शिकून आपलं जीवनमान सुधारावर यासाठी संबंध भारतभर माननीय श्री थोर समाज सुधारक नामदेव भोसले हे तळागाळातील दर्या डोंगरातील राणा वनातील राहणाऱ्या पारधी पाड्यांवर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेत आहे शासनाला जागा करून पारधी समुदायाला लागणाऱ्या ज्या सोयी सुविधा आहे ते मात्र पुरवण्याचे काम करीत आहे मराठवाडा विदर्भ असो की भारतातले अन्य कुठलेही ठिकाण जिथे पारधी समुदाय हा असेल आणि तो हालाखीच्या परिस्थितीत असेल तिथे तिथे पोहोचून पारधी समुदायासाठी मात्र अशी ची किरण ठरत आहे पारधी समुदायाने कुठल्याही योजनेपासून राहू नाही व पारधी समुदाय हा शिकून सुशिक्षित होऊन इतरांप्रमाणेच प्रवाहात यावा यासाठी मात्र थोर समाज सुधारक पुरस्कृत श्री नामदेव भोसले हे आपल्या जीवाचं रान करून सातत्याने पायपीट करून असेल त्या ठिकाणी असेल त्या गावात गावापासून लांब असो वस्ती की जंगलात असो अशाही ठिकाणी पारधी समाजातील वेड्याबड्यांवर जाऊन पारधी समाजातील समस्या जाणून घेत आहे त्यांच्या भेटी घेत आहे व शासनाला निदर्श आणून देत आहे की अजूनही पारधी समुदाय हा प्रत्येक गोष्टीपासून वंचित आहे ते घर असो जातीचा दाखला असो राशन कार्ड असो ओळखीचे अन्य पुरावे असू द्या की इतर सुविधा अजूनही पारधी समुदाय पर्यंत पोहोचलेल्या नाहीत शासनाने या सोयी सुविधा पारधी समुदायापर्यंत पोहोचवाव्यात यासाठी शासनाला सोबत घेऊन माननीय श्री नामदेव भोसले हे प्रत्येक पारधी समाजातील प्रत्येक बेड्यांवर जाऊन त्यांच्या समस्या शासनाच्या निदर्शनात आणून देऊन त्या त्या पारधी वस्तीवर त्या त्या सोयी सुविधा शासनाकडून पुरवत आहे असे मत यावेळेस थोर समाज सुधारक पुरस्कृत साहित्यिक श्री माननीय नामदेव भोसले यांनी व्यक्त केले आदिवासी भाषेतील संस्थेच्या माध्यमातून अशा पारधी वस्त्यांवर व भिड्यांवर जाऊन पारधी समुदायांमध्ये शिक्षणाप्रती जनजागृती निर्माण करावी व पारधी समुदायाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन पारधी समुदायाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य सातत्याने सुरू असू द्या तुम्हाला येणाऱ्या अडचणी समुदाया प्रती असो समाजाला लागणाऱ्या सोयी सुविधा असो यासाठी आम्ही सातत्याने सदैव तुम्हाला सहकार्य व मदत करीत राहू असे मत यावेळी आयपीएस अधिकारी माननीय श्री राहुल चव्हाण व थोर समाज सुधारक पुरस्कृत साहित्यिक माननीय श्री नामदेव भोसले सर यांनी आदिवासी फासेपारधी बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अचिन पवार यांच्याशी बोलताना व्यक्त केले यावेळी. पीएसआय राजू सोनपित्रे, पीएसआय सिद्धार्थ सोमकुवार पोलीस कॉन्स्टेबल प्रवीण घनमोडे उपस्थित होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242